MAHMARI 19358/13/1/2000 - TC


विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष विसावे / अंक ९ / सप्टेंबर २०१९

## संपादकीय

### विनोबा सारस्वत



आचार्य विनोबा भावे
(११ सप्टेंबर १८९५ - १५ नोव्हेंबर १९८२)

विनोबा भावे या अवलिया संतपुरुषाचा भारताच्या उर्जस्वल जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. ११ सप्टेंबर पासून त्यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष सुरू होत आहे. विनोबांची ओळख महाराष्ट्रात 'गीताई' या त्यांच्या ग्रंथामुळे आहे. त्यांनी दिलेली 'गीता प्रवचने' खूप प्रसिद्ध आहेत. साने गुरुजींसारखा भाषाप्रभू 'गीता प्रवचने' या ग्रंथाचा 'लेखकू' झाला.

विनोबांची ओळख महात्मा गांधींचे पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून आहे. विनोबांच्या भाषाप्रभुत्वावर व तपस्वी जीवनावर गांधीजी लुब्ध होते. विद्वत्ता ही केवळ प्रवचनं व व्याख्यानाला न वापरता तिचा वापर व्यक्तिगत पातळीवर आपल्या आचरणात देखील झाला पाहिजे या विचाराचे विनोबा होते. ज्ञानेश्वरांनी म्हटलंय की, 'जयांचे लीलेमाजी नीती। जियाली असे' अर्थात ज्यांच्या चालण्या-बोलण्यात, वागण्यात नीती जीवंतपणे दृग्गोचर होते. आचार्य या शब्दाची व्याख्या परंपरेने फार सुरेख केली आहे.

**'आचिनोति च शास्त्राणि आचारे स्थापयत्यपि। स्वयमाचरते यस्मात् तस्मात् आचार्य उच्यते।।**

अर्थात जो वेगवेगळ्या शास्त्रांचा अभ्यास करतो व त्यातील मूल्ये आपल्या आचरणात प्रतिष्ठित करतो त्याला 'आचार्य' ही संज्ञा दिली जाते. केवळ अभ्यासक्रम पूर्ण करून वेतन घेणाऱ्याला आचार्य म्हणता येणार नाही. वरील व्याख्येनुसार 'आचार्य' पदवी विनोबांना चपखलपणे देता येते. जीवनाचे ध्येय हे केवळ अध्ययन व अध्यापन ठेवणारा हा महापुरुष आसेतु हिमाचल भ्रमण करत राहिला. भारतातील प्रत्येक राज्यातील भाषा, संस्कृती व लोकपरंपरा विनोबांनी आत्मसात केली. त्यांच्या अध्यापनाच्या कौशल्याबद्दल त्यांना 'राष्ट्रीय शिक्षक' अशी उपाधी मिळाली.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

गांधीजींचे आध्यात्मिक वारसदार म्हणून देखील त्यांचा लौकिक होता.

११ सप्टेंबर १८८५ ते १५ नोव्हेंबर १९८२ हा त्यांचा कार्यकाळ. रायगड जिल्ह्यातील गागोदे या गावी त्यांचा जन्म झाला. संस्कृत, प्राकृत, संतवाङ्मयाचे बाळकडू त्यांना त्यांच्या आईकडून मिळाले. आईला गीता सोपी करून मराठीत सांगण्यासाठी विनोबांनी 'गीताई' नावाचा अजोड ग्रंथ लिहिला. 'गीताई' म्हणजे मराठीतील गीतेची समश्लोकी आहे. त्याच्या प्रस्तावनेत विनोबा गीतेला आईची उपाधी देतात –

**गीताई माउली माझी। तिचा मी बाळ नेणता।**
**पडता रडता घेई। उचलोनि कडेवरी।।**

विनोबा भावेंना १९५८ सालचा 'रेमन मॅगसेसे' ॲवार्ड मिळाला. १९८३ साली भारतरत्न मिळाला. या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले असे न म्हणता त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे पुरस्कार सन्मानित झाले असे म्हणावे लागेल. भूदान चळवळीमध्ये त्यांनी केलेले योगदान अचंबित करणारे आहे.

गांधीजींच्या सांगण्यावरून विनोबा ८ एप्रिल १९९१ ला वर्धा येथील आश्रमाची जबाबदारी सांभाळण्यास पोहोचले. त्यांनी १९२३ मध्ये 'महाराष्ट्र धर्म' नावाचे मराठी मासिक सुरू केले व त्यात उपनिषदांवर लेख लिहिले. विनोबा भावे यांची ग्रंथसंपदा अफाट आहे. त्यांचा व्यासंगही अफाट होता. व्हि. एस. नायपॉल, जयप्रकाश नारायण, पु. ल. देशपांडे आदी लेखकांनी त्यांच्या अतिरेकी गांधीभक्तीवर व इंदिरा गांधींनी घोषित केलेल्या आणीबाणी वरील भूमिकेवर टीका केली. 'सरकारी संत' म्हणून त्यांची हेटाळणी देखील झाली. विनोबांनी आणीबाणीला 'अनुशासन पर्व' अशी संज्ञा दिली होती. या भूमिकेवरून देखील त्यांच्यावर खूप टीका झाली. मात्र, विनोबांनी केलेली ग्रंथसेवा, अध्ययन–अध्यापनात दाखवलेली रुची यामुळे त्यांचा मोठा प्रभाव भारतीय विचार विश्वावर झाला असे आवर्जून नमूद करावयास हवे.

विनोबांच्या ग्रंथाची संख्या व त्यांची नावे जर सहज डोळ्यांखालून घातली तर त्यांना अवगत असलेल्या भाषा व त्यांच्या बुद्धीची झेप अचंबित करणारी भासते. सर्व धर्मांच्या धर्मग्रंथाचे मूळातून अध्ययन व त्यावर स्वतःचं असं मूलगामी चिंतन विनोबा मांडत. हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिश्चन इत्यादी महत्त्वाच्या सर्व धर्मांचे ग्रंथ व त्यांचे सार त्यांनी खास आपल्या शैलीत मांडले आहे.

'ऋग्वेदसार' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत विनोबा लिहितात –

'चारी वेदांचे अध्ययन करण्याची संधी मला मिळाली असली तरी सखोल अध्ययन ऋग्वेदाचे झाले आहे. १९१८ पासून १९६८ पर्यंत आणि त्यानंतरही सतत वेदांचे अध्ययन चालले. चार–साडेचार हजार मंत्र मला पाठ आहेत. त्यातून १३१९ मंत्र निवडले. ऋग्वेदाचे १०५५२ मंत्र आहेत. त्याचा अष्टमांश केला. अष्टमांश काढा. आयुर्वेदात क्वाथ म्हणतात. क्वाथ म्हणजे काढा. संपूर्ण वेदाचा एक अष्टमांश तितका वेगळा काढून प्रकाशित केला. पठनाला सोपे व्हावे यासाठी हे केले. पन्नास वर्षांच्या अध्ययनाचा हा परिणाम आहे.'

विनोबा वेदांच्या भाष्यावर बोलताना म्हणतात की, प्रत्येकाचे भाष्य बरोबर असू शकते. विनोबांच्या मते भाष्य प्रमाण नाही, अक्षर प्रमाण आहे. भाषांतर तर मुळीच कामाचे नाही. 'इंगजीत भाषांतर कराल

(पृष्ठ क्र.४० वर)




**वर्ष विसावे/अंक ९/सप्टेंबर २०१९**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. प्रशांत पु. धर्माधिकारी | |
| २) | चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | क्रांतिकारी घडामोडीचा अन्वयार्थ | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ७ |
| ४) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १० |
| ५) | मानसिक आजारी व्यक्तींसाठी डॉ. अब्राहम लो यांची रिकव्हरी पद्धत | प्रा. डॉ. अनिल वर्तक | १३ |
| ६) | मॉस्को मेट्रो | श्री. संकेत कुलकर्णी | १९ |
| ७) | अरुणा ढेरे यांची विलक्षण कलाकृती: कृष्णकिनारा.. | प्रा. श्रीपाद जोशी | २२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- <u>आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.</u>
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# चीनचे परराष्ट्र धोरण व भारताची डोकेदुखी
(भाग - २)

*चीनचे परराष्ट्र धोरण व त्याचा भारतावरील विपरीत परिणाम याचे विवेचन करणारा लेख - संपादक*

माओ-त्से-तुंगचा १९७६ साली मृत्यू झाला व त्यानंतर देंग-जाऊ-पिंग (Deng Xiaoping) यांच्याकडे साम्यवादी चीनची सत्तासूत्रे गेली. देंग-जाऊ-पिंग हा चाणाक्ष साम्यवादी नेता होता. त्याच्या लक्षात आले की, चीनमधील साम्यवादी राजवट टिकवून ठेवावयाची असेल तर चीनची आर्थिक प्रगती साध्य करून तेथे सुबत्ता व समृद्धी आणणे क्रमप्राप्त आहे. देंगला चीनमधील साम्यवादी राजवट फक्त टिकवायचीच नव्हती, तर तिची चीनवरील पकड घट्ट करावयाची होती. त्यामुळेच त्याने साधारणतः १९८० च्या दशकापासून चीनमध्ये आर्थिक धोरणांबाबत साम्यवादी तत्त्वांना मूठमाती देऊन तेथे आर्थिक उदारीकरण करण्यास सुरुवात केली. यानंतर खऱ्या अर्थाने परदेशी कंपन्यांना व उद्योजकांना चीनची कवाडे खुली झाली. अर्थात, याचा सर्वात जास्त फायदा अमेरिकेने घेतला. १९९० च्या दशकात तर अनेक बड्या अमेरिकन कंपन्यांनी चीनमध्ये आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली. बिल क्लिंटन (१९९२ ते २००० या काळात हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांनी अमेरिकेतील डेमॉक्रेटीक पक्षाच्या वतीने राष्ट्राध्यक्षीय निवडणूक लढविली होती. या पक्षाचे चिन्ह गाढव आहे.) यांच्या काळात तर अमेरिका व चीनच्या दरम्यानचे व्यापारी संबंध मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होण्यास मदत झाली असे म्हणणे वावगे ठरू नये. २१ व्या शतकाची सुरुवात झाल्यावर चीनमधील आर्थिक उदारीकरणाच्या नीतीचे त्या देशात दृष्य व चांगले परिणाम दिसू लागले. २००० ते २०१९ या गेल्या १९ वर्षांच्या काळात तर चीनने अजूनच जास्त प्रमाणात आर्थिक प्रगती साध्य केल्याचे निदर्शनास येते. चीनने आर्थिक प्रगतीसोबतच पायाभूत सुविधांचा विकास करण्याकडे प्रकर्षाने लक्ष दिले व यातूनच चीनमध्ये शहरांचा विकास तसेच महामार्ग, लोहमार्ग, धरणे इत्यादींचे जाळे पसरले. याकाळात चीनने साध्य केलेली महत्त्वाची उपलब्धी वा गोष्ट म्हणजे, या देशाने पद्धतशीरपणे आपल्या रोजनिशीतल्या जीवनात लागणाऱ्या वा उपयोगी पडणाऱ्या वस्तुंचे मोठ्या प्रमाणात केलेले उत्पादन व त्याची निर्यात ही होय. या वस्तूंमध्ये टॉर्च, पेन, सेल, मोबाईल फोन, दूरदर्शन संच, शोभेच्या वस्तू, ट्यूबलाईट इत्यादींचा समावेश होतो. चीनने या वस्तूंचे विक्रमी उत्पादन तर केलेच; परंतु या वस्तूंची निर्यात न भूतो न भविष्यती प्रमाणात जगाच्या कानाकोपऱ्यात केली, किंबहूना अजूनही ती करत आहे. चिनी वस्तू उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, युरोप, आशिया, आफ्रिका या खंडांमध्ये तसेच दक्षिणेकडे ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड पासून आग्नेय आशियामध्ये म्हणजे जवळ-जवळ संपूर्ण जगात उपलब्ध आहेत. एवढेच नव्हे तर या वस्तूंचा खप विक्रमी आहे. त्यामुळे चीनला कोट्यावधी डॉलर्समध्ये उत्पन्न मिळत असते. भारतामध्ये देखील चिनी वस्तू मोठ्या प्रमाणात विकल्या जातात. त्यामुळेच आता भारतीयांना असे सांगण्याची वेळ आली आहे की, चिनी वस्तू विकत घेऊन अप्रत्यक्षरित्या भारताच्या शत्रूला प्रबळ करण्यास मदत करु नका. चीनने आपली ही आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद नीतीचा पुरेपूर उपयोग निदर्शनास येते. चीनवर पश्चिमेकडील प्रगत राष्ट्रांकडून

व प्रामुख्याने अमेरिकेकडून होणारा आरोप (नव्हे ते तथ्यच आहे) की, चीन सततपणे कॉपीराईटच्या (स्वामिहक्क) नियमांचे उल्लंघन करत असतो व यातून अमेरिकन वस्तूंची हुबेहूब नक्कल करून त्या वस्तू चीनमध्ये व इतरत्र स्वस्त किंमतीत वा दरात विकल्या जातात व उपलब्ध केल्या जातात. हा प्रकार, मोबाईल फोन व मोबाईल फोनचे तंत्रज्ञान, हॉलीवूड पटाच्या डी.व्ही.डी, संगणकीय तंत्रज्ञान, संगणकात वापरले जाणारे सॉफ्टवेअर्स, गाड्या, दुचाक्या इत्यादी वस्तूंबाबत सर्रासपणे केला जातो. येथे एक बाब नमूद करावीशी वाटते व ती अशी की, भारतातील बजाज ऑटो ह्या प्रसिद्ध दुचाकी बनविणाऱ्या कंपनीने 'पल्सर' (Pulsur) ही दुचाकी पहिल्यांदा बाजारात आणली तेव्हा ती भारतातच नव्हे तर परदेशातदेखील लोकप्रिय ठरली. त्यामुळे चीनने हुबेहूब पल्सरसारखीच दुचाकी बनवून (नव्हे या दुचाकीची हुबेहुब नक्कल करून) ती गल्सर (Gulsar) या नावाने विकण्यास सुरुवात केली. चीनवर सद्यस्थितीत होणारा आरोप म्हणजे चीन काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये परदेशी गुंतवणूकीस परवानगी देत नाही. चीनच्या हुवेअी (Huawei) या मोबाईल बनविणाऱ्या कंपनीवर तर ही कंपनी त्यात वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअरच्या आधारे तो फोन वापरणाऱ्या व्यक्तीची फोनमधील माहिती व संभाषण 'कॉपी' करून हेरगिरी करते असा आरोप अमेरिकेत व पाश्चात्य जगात केला जातो. त्यामुळे या कंपनीवर अमेरिकेत सध्या बंदी टाकण्यात आली आहे. मात्र, याच कंपनीला रशियामध्ये फाईव्ह-जी (5-G) नेटवर्क उपलब्ध करून देण्याचे काम मिळाले आहे. चीनने अगोदर म्हटल्याप्रमाणे साम, दाम, दंड, भेद या सर्व तत्त्वांचा वापर करून मोठ्या प्रमाणात आर्थिक प्रगती साध्य केली आहे. सध्या तर चीन हा जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असणारा देश बनला आहे. अमेरिका चीनची ही आर्थिक प्रगतीची भागदौड रोखण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करताना दिसत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी तर, 'चीन आर्थिक विकसनशील' देश या नावाखाली प्रगत देशांकडून अनेक व्यापारी सवलती मिळवतो परंतु तो खऱ्या अर्थाने आर्थिक विकसनशील देश नसून प्रगत वा विकसीत देश आहे; त्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय व्यापारात दिल्या जाणाऱ्या सवलती काढून टाकाव्यात, अशाप्रकारचे विधान केले आहे. चीनच्या तुलनेत भारत आर्थिक प्रगती व पायाभूत सुविधांचा विकास याबाबतीत फारच पिछाडीवर असल्याचे निदर्शनास येते.

येथे चीनच्या आर्थिक विकासाबाबत एवढे विस्तृतपणे लिहिण्याचे कारण म्हणजे सध्या चीनकडे मोठ्या प्रमाणात पैसा उपलब्ध आहे. चीन हा पैसा अगोदर नमूद केल्याप्रमाणे 'चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरीडॉर', 'वन बेल्ट वन रोड' तसेच जगभरात व प्रामुख्याने दक्षिण आशियातील भारताच्या शेजारील राष्ट्रांमधील विविध प्रकल्पांमध्ये ओतत आहे. थोडक्यात चीन आपल्या आर्थिक सत्तेचा व वर्चस्वाचा उपयोग भारतविरोधी राजकारणासाठी व कारवायांसाठी करत आहे. त्यामुळे भारताने सुद्धा वेगाने सर्वांगीण आर्थिक विकास करणे ही काळाची गरज आहे. मात्र, असे करताना या आर्थिक विकासाचा लाभ फक्त काही मूठभर लोकांपर्यंत सीमीत न राहता तो समाजातील सर्व स्तरांपर्यंत व प्रामुख्याने कमकुवत घटकांपर्यंतदेखील पोहोचला पाहिजे याची दक्षता घ्यायला हवी. असो.

भारताचा आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात झाला तर, भारतदेखील आपल्या शेजारील राष्ट्रांना सढळ हस्ते आर्थिक मदत करू शकेल. असे झाल्यास, ही राष्ट्रे आपसूकच पुन्हा एकदा भारताकडे वळतील यात वाद नाही. अर्थात, भारत आपल्या शेजारील राष्ट्रांना आपल्या परीने सर्वोतोपरी मदत करत असतोच. परंतु ही मदत अजून जास्त प्रमाणात वाढविण्याची गरज आहे. येथे आपणास नेपाळचे उदाहरण पाहणे संयुक्तिक ठरेल.

भारत व नेपाळचे पूर्वापारपासून चांगले व सदृढ राजकीय व सांस्कृतिक संबंध राहिलेले आहेत. भारताव्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात हिंदूंची संख्या असणारा देश म्हणजे नेपाळ होय. येथे देखील हिंदू पंचांगाप्रमाणेच हिंदू सण साजरे केले जातात. काठमांडूतील पशुपतीनाथाचे शिवमंदिर तर जगप्रसिद्ध आहेच. परंतु फार कमी लोकांना माहिती असेल की, येथे भारतातील (दक्षिण भारतातील) पुजाऱ्यांना पूजेचा मान आहे. नुकताच वारकऱ्यांचा एक मोठा मेळा काठमांडूत भरला होता. नेपाळमध्ये हिंदूंप्रमाणेच बौद्ध धर्मीयदेखील आहेत. काही अभ्यासकांच्या मते महात्मा गौतम बुद्धाचे लुम्बिनी हे जन्मगाव नेपाळमध्येच होते. असे गाढ सांस्कृतिक संबंध असूनदेखील सध्या नेपाळ चीनच्या जास्त नजीक जात असल्याचे चित्र दिसते. नेपाळचे सध्याचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली हे चीनकडे जास्त प्रमाणात झुकताना दिसतात. भारताच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा होय.

चीनने दक्षिण चिनी समुद्रात देखील एक नवीन उपद्व्याप सुरू केला आहे व तो असा की, येथे चीनने कृत्रिम बेटे बनविण्याचा सपाटा लावला आहे. या बेटांवर चीनचा विमानतळे बांधण्याचा, तसेच तेथे बंदरांचा विकास करण्याचा मनसुबा आहे. चीनच्या या उपद्व्यापामुळे व्हीएतनाम, फिलिपाइन्स व इंडोनेशिया हे देश त्रस्त झालेले आहेत. त्यांनी चीनच्या या प्रकाराचा निषेधच नव्हे तर त्यास विरोध देखील दर्शविला आहे. भारताने या देशांशी संपर्क वाढवून व अजून जास्त प्रमाणात चांगले संबंध निर्माण करून त्याचा चीनच्या विरोधात वापर केला पाहिजे.

आतापर्यंत रशियाच्या व्लॅडिव्होस्टक (Vladivostok) या अतिपूर्वेकडील चीनच्या सरहद्दीवर असणाऱ्या शहरातून मॉस्कोपर्यंत जाणारा लोहमार्ग म्हणजे जगातील सर्वात मोठा (लांब) लोहमार्ग समजला जाई. परंतु सध्या चीनने पूर्व चीनमधील यिऊ (Yiwu) या शहरातून निघून कझाकस्थान, बेलारुस, फ्रान्स मार्गे स्पेनपर्यंत जाणारा लोहमार्ग बांधला आहे व हा लोहमार्ग जगातील सर्वात मोठा लोहमार्ग बनला आहे. याच लोहमार्गाचा एक मार्ग फ्रान्समधून लंडनकडे देखील जातो. चीनमधून २०१४ च्या डिसेंबरमध्ये या लोहमार्गावरून नाताळाच्या वस्तू घेऊन जाणारी पहिली आगगाडी स्पेनपर्यंत गेली होती. अशाप्रकारे चीन भव्यदिव्य प्रकल्प हाती घेऊन पूर्ण करत आहे व या सर्वांचा वापर अर्थातच चीन येणाऱ्या काळात जगाच्या राजकारणावर व आंतरराष्ट्रीय घडामोडींवर प्रभाव टाकण्यासाठी करणार यात वाद नाही. यातून चीनची जगातील प्रभावशाली सत्ता बनण्याची अभिलाषा लपून राहीलेली नाही हे सत्य आहे.

जगाच्या राजकारणातील चीनचा वाढता दबदबा म्हणजे भारताच्या दृष्टीने असणारी फारच शोचनीय बाब आहे. त्यामुळे भारताला चिनी ड्रॅगनला वेळीच आवर घालण्याची गरज आहे, नव्हे ती काळाची गरज आहे. भारताचे सध्याचे परराष्ट्रमंत्री सुब्रमण्यम् जयशंकर हे पूर्वी भारताचे परराष्ट्र सचिव होते व ते चीनच्या मनसुब्यांना चांगलेच ओळखून आहेत. ही भारताच्या दृष्टीने जमेची बाब आहे. परंतु नुकतेच सुषमा स्वराज यांच्या झालेल्या निधनामुळे भारताचे परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने नुकसान झाले आहे. सुषमा स्वराज यांनी २०१४ ते २०१९ या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणाची धुरा समर्थपणे सांभाळली होती. अर्थात स्वातंत्र्यानंतरच्या सर्वच सरकारांनी आपापल्या परीने भारताच्या परराष्ट्र धोरणाला त्या त्या काळानुसार योग्य दिशा देण्याचे प्रयत्न केलेले आहेत. डॉ. मनमोहन सिंग यांनी देखील 'लूक इस्ट' (Look East) या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करून भारताने आपल्या पूर्वेकडे व आग्नेय आशियामध्ये असणाऱ्या देशांकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्याशी आपले संबंध सुधारण्याची वा घनिष्ठ संबंध निर्माण करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त

केले होते. भारताचे सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील द्रष्टे नेते असून, ते भारताच्या परराष्ट्र धोरणाची आखणी दूरदृष्टी ठेऊन करत असताना दिसतात. नरेंद्र मोदींनी 'डोकलाम'च्या माध्यमातून चीनने भारताची खोड काढल्यास भारत बघ्याची भूमिका घेणार नाही असे चीनला व संपूर्ण जगाला दाखवून दिले आहे. ही बाब निश्चितच वाखाणण्यासारखी आहे. मोदी सरकारने काश्मीरबाबतचे ३७० कलम हटवून देखील पाकिस्तान व चीनला सूचक संदेश दिल्याचे दिसते. या सर्व घटना भारताच्या दृष्टीने व प्रामुख्याने चीन नावाच्या ड्रॅगनला रोखण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या ठरणार आहेत.

साधारणतः १९४९ ते १९५९ या कालावधीत भारत-चीन संबंध चांगले असल्याचे निदर्शनास येते. १९५५ साली तर चीनचे तत्कालीन पंतप्रधान चाऊ-एन-लाय (Chou-en-lai) हे बांडूंग (इंडोनेशिया) येथे भरलेल्या अलिपत्ततावादी राष्ट्रांच्या परिषदेस चीनचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. या परिषदेत भारतातर्फे पंतप्रधान पंडित नेहरू, युगोस्लावियातर्फे मार्शल टिटो, इजिप्ततर्फे गमाल अब्दुल नासेर, घाणातर्फे क्वामे नक्रूमा तर इंडोनेशियातर्फे डॉ. सुकार्णो या नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. १९५९ साली तिबेटी जनतेने चीनच्या राजवटीविरुद्ध बंड केले व याला उत्तर म्हणून चीनने तेथे लष्करी कारवाई केला. ३१ मार्च १९५९ रोजी तिबेटचे तत्कालीन शासक व तिबेटी जनतेचे धर्मगुरू दलाई लामा यांना तिबेट सोडावे लागले व ते आपल्या ८० अनुयायांसह हिमालयाच्या पर्वतरांगा अक्षरशः पायी चालत ओलांडून भारतात दाखल झाले. त्यांनी भारतात आल्यावर तिबेटचे हद्दपारीतील सरकार स्थापन केले. आजही दलाई लामा यांचे तिबेटचे हद्दपारीत असलेले प्रतिसरकार हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथे अस्तित्वात आहे. अर्थात, दलाई लामा यांनी २०११ पासून सक्रीय राजकीय जीवनातून निवृत्ती घेतली आहे. असे म्हटले जाते की, चीनने तिबेटवर केलेल्या या लष्करी कारवाईत जवळजवळ ८७,००० तिबेटी लोकांचा मृत्यू झाला व १,००,००० तिबेटी लोकांना तेथून पळ काढून भारत, नेपाळ, भूतान आदी देशांमध्ये आश्रय घ्यावा लागला. भारताने तिबेटी लोकांच्या या न्याय्य लढ्याला दिलेल्या नैतिक पाठिंब्यामुळे चीन पुरता चिडला व त्यामुळेच भारतासोबतचा सीमावाद उकरून काढून भारतावर १९६२ साली आक्रमण केले. तोपर्यंत भारत 'हिंदी-चीनी भाई-भाई'च्या घोषणा देत होता. परंतु चीनने १९६२ साली भारताचा विश्वासघात करून भारतावर आक्रमण केले व भारताच्या पाठीत सूरा खुपसला. १९६२ च्या युद्धानंतर चीनने पाकिस्तानला भारताविरुद्ध सर्वोतोपरी व अनेकदा नियमबाह्य मदत केली असल्याचे निदर्शनास येते. यात प्रामुख्याने शस्त्रास्त्र पुरवठा तसेच लष्करी मदतीचा समावेश होतो. (क्रमशः)

**संदर्भ ग्रंथ :**


चायना : फेयरबँक व गोल्डमन

द चायना - पाकिस्तान ॲक्सीस : अँड्र्यू स्मॉल
एशियाज् न्यू जिओपॉलिटिक्स

चायनाज् इंडिया : वॉर : कोलीजन् - बेर्टील लिंन्टर
कोर्स ऑन द रुफ ऑफ द वर्ल्ड

इंडिया टर्न्स ईस्ट इंटरनॅशनल : फ्रेडरिक ग्रेयर
एंगेजमेंट अँड यू. एस्.-चायना
रायव्हलरी



**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


•••

# क्रांतिकारी घडामोडीचा अन्वयार्थ

*अमेरिकन काँग्रेसमधील सिनेट सभागृहाने नुकतेच भारताला 'नॉन नॅटो अलाय' हा दर्जा देण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण विधेयक मंजूर केले आहे. हे विधेयक अशा वेळी मंजूर करण्यात आले आहे की, ज्यावेळी व्यापारतुटीच्या प्रश्नावरून, तसेच भारतीय बाजारपेठेत अमेरिकन कंपन्यांना प्रवेश देण्याच्या प्रश्नावरून, इराणकडून तेलआयातीसंदर्भात, तसेच रशियाकडून एस-४०० अँटी बॅलेस्टीक मिसाईल सिस्टीम विकत घेण्याच्या प्रश्नावरून भारत व अमेरिकेमध्ये कमालीचा तणाव वाढला आहे. त्यामुळे हा दर्जा मिळाल्यास हा तणाव काही प्रमाणात निवळण्याची शक्यता आहे. हा दर्जा मिळाल्यानंतर भारताचे लष्करी सामर्थ्य वाढणार आहे. त्यामुळे चीनला भारताचा धाक निर्माण होणार आहे. परिणामी, एकूणच आशिया खंडातील सत्तासमतोलाच्या राजकारणावरही याचा परिणाम होणार आहे. यावर प्रकाश टाकणारा परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख - संपादक*

अमेरिकन काँग्रेसमधील सिनेट सभागृहाने नुकतेच एक महत्त्वपूर्ण विधेयक मंजूर केले आहे. हे विधेयक नॅशनल डिफेन्स ॲथोरायझेशन ॲक्ट २०२० या कायद्यामध्ये सुधारणा सुचवणारे आहे. हे सुधारणा विधेयक भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या विधेयकामुळे भारताला 'नॉन नॅटो अलाय'चा दर्जा मिळेल. त्यामुळे हे विधेयक भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण संबंधामध्ये क्रांतिकारी परिवर्तन घडवून आणण्यास कारणीभूत ठरणार आहे. तसेच या विधेयकामुळे संपूर्ण आशिया खंडातील सत्तासमतोलाच्या राजकारणावर परिणाम होणार आहे. त्यामुळे हे विधेयक नेमके काय आहे, त्याचा भारत - अमेरिका संबंधांवर आणि आशियातील राजकारणावर कसा परिणाम होणार आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.

**'नॅटो'चा इतिहास :-**

मुळातच नॅटो (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) ही शीतयुद्ध काळात उदयाला आलेली लष्करी संघटना आहे. शीतयुद्धाच्या राजकारणाचा भाग म्हणून ही संघटना अस्तित्वात आली. या संघटनेच्या माध्यमातून अमेरिका आणि पश्चिम युरोपिय राष्ट्रे यांची एक संयुक्त लष्करी फळी नेमली गेली. ही फळी साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी कार्यरत होती. या संघटनेने अमेरिका आणि युरोपीय देश यांच्यामध्ये एक सामायिक व्यासपीठ तयार केले. १९९० मध्ये शीतयुद्ध संपुष्टात आले. त्यावेळी शीतयुद्ध काळात तयार झालेल्या सिएटो, सेंटो यांसारख्या संघटना, तसेच सोव्हिएत रशियाने केलेला वारसा करार हे संपुष्टात आले. पण नॅटो ही एकमेव संघटना अशी आहे जी शीतयुद्धोत्तर काळातही कायम राहिली आणि आजही ती टिकून आहे. तथापि, शीतयुद्धकाळातील अमेरिका आणि रशिया संघर्ष संपुष्टात आल्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये नॅटोने आपले स्वरूप आणि उद्दिष्टे बदलली आहेत. आता नॅटोने तीन प्रमुख उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवली आहेत.

१) लोकशाहीचा प्रसार करणे.
२) संघर्षाची सोडवणूक करणे, म्हणजे दोन देशांमधील किंवा देशांतर्गत संघर्ष सोडवणे.
३) संघर्ष व्यवस्थापन.

या उद्दिष्टांनुरूप काम करताना शीतयुद्धोत्तर काळात नॅटोचा विस्तारही झाला. पूर्वी सहभागी नसणारे पूर्व युरोपीय देशही कालौघात या संघटनेमध्ये सहभागी झाले. आज या संघटनेची सदस्यसंख्या २९ इतकी आहे.

### नॉन नॅटो अलाय म्हणजे काय?




नॉन नॅटो अलायन्स हा प्रकार १९८९ मध्ये सुरू झाला. अमेरिकेकडून या स्वरूपाचा दर्जा हा एखाद्या मित्रराष्ट्राला दिला जातो; यासाठी त्यांनी काही निकष ठेवलेले आहेत. नॅटोचा सदस्य नसला तरीही ज्या देशाचे अमेरिकेशी घनिष्ट लष्करी वा संरक्षण संबंध आहेत, अमेरिकेच्या लोकशाहीचा प्रसार, दहशतवादाचा सामना करणे या उद्दिष्टांमध्ये जो देश मदत करतो त्या देशाला हा दर्जा दिला जातो. अशा प्रकारचा दर्जा दिल्यामुळे या राष्ट्रांबरोबर घनिष्ट लष्करी संबंध प्रस्थापित करण्याची परवानगी मिळते. तसेच अमेरिका त्या राष्ट्राबरोबर मोठ्या प्रमाणावर संरक्षण क्षेत्रातील व्यापार करू शकते. त्याचबरोबर अमेरिका या देशाबरोबर संरक्षणक्षेत्रातील संयुक्त संशोधन आणि विकास कार्यक्रम प्रस्थापित करू शकते. हा दर्जा दिल्यानंतर दोन्ही राष्ट्रे मिळून काही संयुक्त तंत्रज्ञानाचा विकास करतात. शिवाय ज्या संवेदनशील तंत्रज्ञानाचा दुहेरी वापर होऊ शकतो (ड्युएल युज टेक्नॉलॉजी) असे तंत्रज्ञानही हस्तांतरीत केले जाते. थोडक्यात, हा दर्जा मिळाल्यानंतर एखाद्या संरक्षण साधनसामुग्रीचा विकास आणि त्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण केले जाते. अशा प्रकारचा दर्जा मिळणाऱ्या देशांना संरक्षणसिद्धतेत संशोधन, तंत्रज्ञान आदी सर्व प्रकारची मदत करण्याची, संयुक्त प्रकल्प उभारण्याची परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्रच अमेरिकन काँग्रेसकडून त्यांच्या राष्ट्राध्यक्षांना दिले जाते. अमेरिकेच्या संरक्षण संबंधांवर अमेरिकन काँग्रेसचे कडक नियंत्रण असते. अमेरिकेकडून कोणाला किती लष्करी मदत दिली जावी हे अमेरिकन काँग्रेसकडून निर्धारित केले जाते. उदाहरणार्थ, पाकिस्तानला जेव्हा काही दशलक्ष डॉलर्सची मदत अमेरिकेकडून दिली जाते तेव्हा त्यासाठीची मंजुरी अमेरिकन काँग्रेसकडून मिळणे आवश्यक असते.

### हा दर्जा किती राष्ट्रांना दिला आहे?

नॉन नॅटो अलायची सुरुवात जरी १९८९ मध्ये झाली असली तरीही १९९३ मध्ये म्हणजे बिल क्लिंटन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम सहा राष्ट्रांना अशा प्रकारचा दर्जा मिळवून दिला. त्यानंतर जॉर्ज बुश यांच्या दहा वर्षांच्या कालखंडात ८ देशांना या प्रकाराचा दर्जा देण्यात आला. बराक ओबामा यांच्या ८ वर्षांच्या कार्यकाळात ट्युनिशिया आणि अफगाणिस्तान (२०१५ मध्ये) या दोन राष्ट्रांना हा दर्जा दिला गेला होता. एकंदरीतच अमेरिकेकडून १५ हून अधिक देशांना हा दर्जा मिळाला आहे. यामध्ये इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलिया तसेच जॉर्डनसारखा मुस्लिमबहुल देशही यामध्ये समाविष्ट आहे.

### पाकिस्तानला हा दर्जा देण्याचे कारण

भारताला हा दर्जा मिळणे प्रस्तावित असताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, पाकिस्तानला हा दर्जा यापूर्वीच देण्यात आला आहे. जॉर्ज बुश यांच्या कार्यकाळात २००४ मध्ये पाकिस्तानला हा दर्जा दिला गेला आहे. त्या काळात अमेरिकेने अफगाणिस्तानातील दहशतवादाविरुद्ध युद्ध पुकारले होते. तालिबानचे उच्चाटन करण्यासाठी, ओसामा बिन लादेन याला पकडण्यासाठी अमेरिकेने लष्करी मोहीम सुरू केली होती. या संपूर्ण संघर्षात अमेरिकेला पाकिस्तानच्या मदतीची गरज होती. अफगाणिस्तानमध्ये युद्धाचे केंद्र होते. मात्र

अफगाणिस्तानात शिरण्यासाठी दोन मार्ग होते. एक इराणमधून व दुसरा पाकिस्तानमधून जाणारा होता. इराणशी अमेरिकेचे शत्रुत्त्व असल्यामुळे पाकिस्तानशिवाय दुसरा मार्ग नव्हता. त्यामुळेच या संघर्षातील पाकिस्तानचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन अमेरिकेने त्यांना हा दर्जा दिला होता. हा दर्जा देण्यामागे आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करणे हे एकमेव उद्दिष्ट होते. हा दर्जा दिल्यानंतर लक्षावधी डॉलर्सची आर्थिक मदत आणि साधनसामग्री ही अमेरिकेने पाकिस्तानला पुरवली आहे.

**भारताला हा दर्जा का?**

आता प्रश्न असा निर्माण होतो की, भारताला हा दर्जा देण्याचा प्रस्ताव का मांडला गेला आहे हा. अमेरिकेने २०१० मध्ये 'पीव्हॉट टू एशिया' ही एक महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. या योजनेअंतर्गत भारताला हा दर्जा देणे प्रस्तावित आहे. अमेरिकेकडून ही योजना प्रामुख्याने चीनकडून भविष्यात निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन आखली गेली. २००१ ते २०१९ या दोन दशकांच्या काळात चीनने आपल्या लष्कराचे आधुनिकीकरण करण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतला आहे. चीनचा विस्तारवाद वाढला आहे. हस्तक्षेपी धोरण वाढले आहे. त्यामुळे आशिया खंडातील अमेरिकेच्या हितसंबंधाना धोका निर्माण झाला आहे. चीनचा विस्तारवाद कसा रोखायचा हे फार मोठे आव्हान अमेरिकेपुढे निर्माण झाले आहे. चीनच्या वाढत्या विस्तारवादावर नियंत्रण ठेवणे हे आशिया खंडातील अमेरिकेच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या दृष्टिकोनातून अमेरिकेला भारताचे लष्करी सामर्थ्य वाढवून चीनच्या वाढत्या सामर्थ्याला शह द्यायचा आहे. थोडक्यात, चीनविरुद्ध काऊंटर वेट म्हणून भारताला पुढे करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. चीनच्या महाकाय लष्करी ताकदीचा सामना करण्यासाठी भारताचे लष्करी सामर्थ्य त्या तोडीचे असणे आवश्यक आहे. त्यासाठी भारताला संरक्षण तंत्रज्ञान हस्तांतरित करावे लागेल, संरक्षणसाधनसामग्री पुरवावी लागेल, तसेच मोठ्या प्रमाणावर लष्करी मदतही करावी लागेल. अशा स्वरूपाची मदत करण्यासाठी 'नॉन नॅटो अलायचा' दर्जा देणे गरजेचे आहे. त्यासाठी हे विधेयक मांडले गेले आहे.

सध्या व्यापारी मुद्द्यांवरून भारत-अमेरिका संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला असला तरी गेल्या काही वर्षांतील स्थिती पाहता भारत आणि अमेरिकेचे संरक्षण संबंध सुधारत आहेत. डीटीटीआय म्हणजे डिफेन्स टेक्नॉलॉजी ट्रान्स्फर इनिशिएटिव्ह या धोरणा अंतर्गत दोन्ही देशांमधील संरक्षण संबंध विकसित होत आहेत. दोन्ही देशांनी काही संयुक्त संरक्षण प्रकल्प आखले आहेत. तसेच या अंतर्गत संरक्षण तंत्रज्ञानाचे हस्तांतरणही होणार आहे. त्याचप्रमाणे भारताला न्युक्लिअर सप्लायर्स ग्रुपचे सदस्यत्व देण्यासाठीही अमेरिका प्रयत्नशील आहे. ही सर्व उद्दिष्टे पूर्ण होण्यासाठी, भारताला लष्करी मदत देणे सोपे जावे यासाठी अमेरिकेने हे विधेयक मांडले आहे. आता अमेरिकेच्या हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये हे विधेयक मंजूर होऊन राष्ट्राध्यक्षांकडे स्वाक्षरीसाठी जाणार आहे. त्यानंतर भारताला हा दर्जा मिळेल. हा दर्जा मिळाल्यानंतर भारताचे लष्करी सामर्थ्य मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे चीनला पोटशूळ उठणार आहे. चीनला भारताचा एक प्रकारे धाक निर्माण होणार आहे. त्यामुळे एकूणच आशिया खंडातील सत्तासमतोलाच्या राजकारणावरही या निर्णयाचा परिणाम होणार आहे.

**- डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी - ९७०२०३५८००

●●●

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

(भाग–६)

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघुशोध निबंध 'दिशा' च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत – संपादक*

**प्रकरण–५**

**मयमतम् (शिल्पशास्त्रम्)**

'ग्रामादीनां मानं विन्यासं चाडपि वक्ष्यतेऽधुना ।'

आता नगरांचे दण्डक आणि नगरांची स्थापना याबद्दलची माहिती देण्यात येत आहे.

''दण्डानां पञ्चशतं क्रोशं तद्विगुणमर्धगव्यूतम् ।
गव्यूतं तद्विगुणं ह्यष्टसहत्रं तु योजनं विद्यात् ।।१।।
अष्टधनुश्चतुरश्रा काकणिका तच्चतुर्गुणं माषम् ।
माषचतुर्वर्तनकं तत्पञ्चगुणं हि वाटिका कथिता ।।२।।
वाटिकया युगगुणिता ग्रामकुटुम्बकावनिः श्रेष्ठा ।''

एक क्रोश – ५०० दण्ड (४ किमी), दोन क्रोश किंवा १००० दण्ड – हे अंतर 'अर्धगण्यूत' मानले जाते, आठ हजार दण्ड अंतर म्हणजे एक 'योजन' आठ धनुष हे अंतर एक काकणिका असे मानले जाते. चार काकणिका (४८ किमी) हे अंतर एक 'मास' असे समजले जाते. चार मास (१९२ ते २०० किमी) हे एक वार्तनिक असे मानले जाते. पाच वार्तनिक (१००० किमी) हे अंतर एक वाटिका असे मानले जाते. पाच वाटिका (५००० कि.मी.) हे अंतर एक 'कुटुंब' मानले जाते.

एवं भूगतमानं दण्डैस्तेषां तु वक्ष्यते मानम् ।
ग्रामस्य शतसहस्त्रैर्दण्डैः पर्यन्तमानमिदमुक्तम् ।।४।।

ग्रामांच्या क्षेत्रफळांचा आता उल्लेख करीत आहे. एका नगराची लांबी एकहजार दण्ड (६ किमी) असू शकते.

विंशातीसहस्त्रदण्डात्तत्समवृध्दया तु पञ्चमानं स्यात् ।
ग्रामे विंशतीभागे कुटुम्बभूमिस्तदेकभागेन ।।५।।

ग्रामांची विभागणी पाच आकारांच्या क्षेत्रफळाप्रमाणे करता येते. प्रत्येक नगराची लांबी २०००० दण्ड (३१ कि.मी.) या पासून सम संख्येने वाढत सहाच्या पाचपटीइतकी म्हणजे १००,००० दण्ड (१५०कि.मी.) इतपर्यंत वाढत जाऊ शकते. 'कुटुंब' या वसतीची लांबी नगराच्या १/२० इतकी असते.

दण्डै पञ्चशतैर्यध्दीनं ग्रामस्य मानमिदम् ।
तस्मात्पञ्चशतध्दर्या यावत् विंशत्सहस्त्रदण्डान्तकम् ।।६।।

पाचशे दण्ड लांबीच्या विस्तारापासून प्रत्येकी ५०० दण्डाने लांबी वाढत जात वीसहजार दण्ड (१२० किमी) इतकी वाढत जाऊ शकते. ५०० दण्ड लांबीची गावे ही कमी महत्त्वाची मानली जातात.

प्रोक्तं चत्वारिंशद्भेदं ग्रामस्य मानमिदम् ।
द्विसहस्त्रदण्डमानादिः सार्धसहस्त्रं सहस्त्रदण्डंच ।।७।।
नवशताथसप्तशतं पञ्चशतं त्रिशतमिति विस्तारम् ।

नगरांची लांबी ४० प्रकारचा मापकात आहे. यांत ३०० दण्ड (१.८ ते २ किमी) लांबीपासून सुरू होत ती पाचशे, सातशे, नऊशे, एकहजार पन्नास ते दोन हजार दण्डापर्यंत लांबी असू शकते.

आता नगरांचे आकार आणि त्यांची वैशिष्ट्ये.

'नगरस्य सहस्रद्विसहस्रमानं च दण्डमानं स्यात् ।।८।।

---

समजावण्यापेक्षा समजून घेण्यामध्ये खरी परीक्षा असते, कारण समजावण्यासाठी अनुभवाचा कस लागतो, तर समजून घेण्यासाठी मनाचा मोठेपणा लागतो!

नगरस्याष्टसहस्रैर्दण्डैः पर्यन्तमानमिदम् ।
द्विसहस्रक्षयतो द्विसहस्त्रान्तं चतर्विधं मानम् ।।९।।

कोणत्याही नगराची लांबी १००० ते २००० दण्ड (६ ते १२ किमी) इतकी असू शकते. आणि ती प्रत्येक नगरामागे २००० दण्ड (१२ किमी) अशी वाढत जाऊन ८००० दण्डापर्यंत (५० किमी) वाढवता येते. (अशाप्रकारे ६ किमी, १२ किमी, २५ ते ५० किमी अशी नगरांची लांबी असू शकते.)

नगरांची विभागणी पाच वेगवेगळ्या प्रकारांत त्यांच्या गुणवत्तेनुसार केली जाते.

ग्राम खेटः खर्वटमथ दुर्गनगरमिति पञ्चविधम् ।
दण्डैस्तेषां मानं वक्ष्येऽहं त्रित्रिभेदभिन्नानाम् ।।१०।।

क'ग्राम','खेट' खर्वट, 'दुर्ग', 'नगर' अशी पाच प्रकारची विभागणी त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे करता येते. आता या गावाची लांबी आणि त्यांची गुणवत्ता यांचे तीन स्तरावरचे क्षेत्रमापन स्पष्ट करीत आहे.

'चतुरधिषष्टिदण्डो ग्रामः स्याध्दीनहीनमिति कथितः ।
ग्रामस्य मध्यमस्य द्विगुणं त्रिगुणं तथोत्तमम् प्रोक्तम् ।।११।।

६४ दण्ड (४०० मी) लांबीचे गांव 'कनिष्ठ' ग्राम समजले जाते. त्याच्या दुप्पट म्हणजे १२८ दण्ड (८००मी) लांबीचे गांव 'मध्यम' समजले जाते आणि त्याच्या तीनपट म्हणजे १९२ दण्ड (१२००मी) लांबीचे गाव उत्तम वर्गात गणले जाते.

'षटपञ्चशद्द्विशतं हीन खेटं सविंशतित्रिशतम् ।
मध्यममुत्तममेवं सचतुरशीति त्रिशतदण्डम् ।।१२।।'

त्यानंतर 'खेट' या नगरांत पण लांबीनुसार तीन विविध प्रकार आहेत. २५० दण्ड (१.५किमी) लांबीचे 'खेट' नगर कनिष्ठ मानले जाते, ३२०दण्ड (२किमी) लांबीचे 'खेट' नगर मध्यम वर्गातले मानले जाते आणि ३८४ दण्ड (२ १/२ किमी) लांबीचे 'खेट' नगर उत्तम वर्गात गणले जाते.

'अष्टौचत्वारिंशिच्चतुःशतं द्वादशं च पञ्चशतम् ।
षट्सप्ततिप०चशतं हीनं मध्यमोत्तमं तु खर्वटम् ।।

आता 'खर्वट' नगराचे तीन प्रकार त्यांच्या लांबीनुसार तज्ज्ञांनी केले आहेत. ४८ दण्ड (३००मी) लांबीचे कनिष्ठ, ५१२ दण्ड (३१२०मी) लांबीचे मध्यम आणि ५७६ दण्ड (३५००मी) लांबीचे उत्तम असे खर्वट नगराचे तीन प्रकार आहेत.

''चत्वारिंशित् षट्शतमधमं दुर्गं चतुःसप्तशतदण्डम् ।
मध्यममुक्तं दुर्गं सप्तशतं षष्टिरष्टौ हि ।।''

'दुर्ग' नगरांत पण तीन विभागण्या आहेत. सर्वात कमी दर्जाचे 'अधम' दुर्ग ६४० दण्ड लांबी (३९००मी), ७०४ दण्ड लांबीचे (४३००मी) मध्यम आणि उत्तम दुर्ग ७६८ दण्डस (४७००मी) लांबीचा अशा या तीन विभागण्या आहेत.

''द्वात्रिंशिदष्टशतकं नगरं षञ्णवत्यष्टशतदण्डम् ।
षष्टीर्नवशतमधमं मध्यममुत्कृष्टमिति यथासंख्यम् ।।१५।।''

८३२ दण्ड (५ किमी) लांबीचे नगर कमी दर्जाचे, ८९६ दण्ड (५ १/२ किमी) लांबीचे नगर मध्यम दर्जाचे आणि ९६० दण्ड (५.९ ते ६ किमी) लांबीचे नगर उत्कृष्ट मानले जाते.

''षोडशदण्डविवृध्या प्रत्येकं नवविधं भवति ।''

सोळा दण्ड (१००मी) लांबी प्रत्येक नगरासाठी वाढल्यास ते नवीन प्रकारचे गणले जाते.

''सर्वेषां ग्रामाणां मङ्गलवीथ्याकृता बहिस्त्वबहिः ।
ब्रह्मस्थानंमुदितं तस्मिन् देवालयं तु वा पीठम् ।।३५।।''

सर्व गावांसाठी बाहेरून वळसा घालणाऱ्या रस्त्याला 'मङ्गलवीथी' असे संबोधले जाते. गावाच्या मध्यभागी एकादे मंदिर अथवा (पुराण, कीर्तन, भजन, गायन) यांसाठी एकादे (व्यास) पीठ असावे.

---

शब्दांपेक्षा शांत राहूनच जास्त आक्रमक होता येतं!

''एकद्वित्रिचतुर्भिः पञ्चभिरपि कार्मुकैश्च मार्गततिः ।
प्राक्प्रत्यग्गतमार्गा ऋजुदण्डमहापथाख्यास्ते ।।१६।।''

रस्त्यांची रुंदी एक, दोन, तीन, चार किंवा पाच धनु (२ १/२मी, ५मी, ७ १/२मी, १०मी किंवा १२ मी) इतकी असावी. पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा रस्ता ६ धनु (१५मी) रुंदीचा असावा. याला महामार्ग असे मानले जाते.

''मध्यमयुक्ता वीथि ब्रह्माख्या सैव नाभिः यस्यात् ।
द्वारसमेता वीथि राजाख्या च द्विपार्श्वतः क्षुद्रा ।।३७।।''

नगरातील मध्यभागी असलेल्या पीठाकडे जाणारा रस्ता 'ब्रह्मविथी' किंवा 'नाभिविथी' असा मानला जातो. नगरांत प्रवेश ज्या रस्त्याने होतो, तो 'राजविथी', 'राजमार्ग' असे मानले जाते. त्याच्या दोन्ही बाजूंस अरुंद किंवा गल्ल्यावजा छोटे रस्ते असावेत.

''सर्वाः कुट्टिमकाख्या मङ्गलवीथी तथैव राजमार्गम् ।
तिर्यग्द्वारसमेता नाराचपथा इति ख्यातः ।।३८।।''

(नगरांतील) सर्व रस्ते दणकट केले आहेत (कुट्टीम) असे मानले जाते. 'मङ्गलविथी', 'राजमार्ग' हेही दणकट केलेले असतात. (चतुष्कोन, लंब चतुष्कोन यांच्या) द्विभाजक रेषेवर (Diagonal) केलेले रस्ते 'नाराचमार्ग' (बाणासारखे) किंवा 'धनुमार्ग' या नांवाने ओळखले जातात.

ग्रामावृता मङ्गलवीथीकाख्या पुरावृता या जनवीथिका स्यात्।
तयोस्तु रथ्याभिहिताभिधा स्यात् पुरातनेरन्यतमैष्वथैवम् ।।३९।।

सर्व गावाला वळसा घालणारा रस्ता (चक्करसडक) 'मङ्गलविथी' या नावाने ओळखला जातो. असाच रस्ता लहान गावाला (पुर) वळसा घालून जाणारा असल्यास तो 'जनविथी' या नावाने ओळखला जातो. हे दोन्ही रस्ते रथांच्या परिवहनासाठी (जाण्या-येण्यासाठी) उपयुक्त असल्याने त्यांना 'रथ्या' या नांवानेही संबोधण्यांत येते. हीं नांवें प्राचीन काळापासून प्रचलित आहेत.

''द्विजकुपरिपूर्णं वस्तु यन्मङ्गलाख्यम् ।
नृपवणिभियुक्तं वस्तु यत्तत्पुरं स्यात् ।।४०।।
तदितरजनवासं ग्राममित्युच्यतेऽस्मिन् ।
मठमिति पठितं यत्तापसानां निवासम् ।।४१।।''

ज्या गावांत ब्राह्मण आणि त्यांचे परिवार रहातात त्या गांवाला 'मंङ्गल' असे संबोधले जाते. जेथे राजपरिवार आणि वाणी लोक रहातात त्याला 'पुर' असे संबोधले जाते. सर्वसामान्यजनांच्या व इतरेजनांच्या वसतिस्थानाला 'ग्राम' असे संबोधले जाते. जेथे 'तपाचरण' शास्त्राध्ययन करणारे संन्यासी, तपस्वी (संसारातून मुक्त झालेले) रहातात, त्या वसाहतीला 'मठ' असे संबोधले जाते.

'प्रागुदगग्रं मार्ग ककनीकृतदण्डवत्तु तन्मध्ये ।
द्वारचतुष्टयं दण्डकमिति भण्यते मुनिमिः ।।४२।।
दण्डवदेका विथी साप्येव दण्डकं प्रोक्तम् ।

(या आधीच्या श्लोकांत निर्दीष्ट केल्याप्रमाणे) ज्या वस्तींत पूर्वेकडे आणि उत्तरेकडे जाणाऱ्या रस्त्यांची योजना करण्यांत आली आहे आणि ज्या वसाहतीत हे रस्ते एकमेकांना छेदून जातात अशा वसाहतीला 'दण्डक' या नावाने विद्वान लोक जाणतात. या वसाहतींना चार प्रवेशद्वारांची योजना केली जाते.

आता 'स्वस्तिक' या नावाच्या वसाहतीचे वर्णन करण्यांत येत आहे.

''नवपदयुक्ते ग्रामे परितो मार्गं तदस्य बहिः।
तस्मात्प्रागुदगग्रात् प्राग्वीथी दक्षिणाग्रा सा ।।४३।।
तस्मात्प्राग्दक्षिणतो दक्षिणवीथी प्रतीचिमुखा।
तस्माद्वागपरतः पश्चिमवीथ्यग्रमुत्तरतः ।।४४।।
अपरोक्तरतस्तस्मादुत्तरवीथ्यां मुखंतत्प्राच्याम्।
एतत्स्वस्तिकमुदितं स्वस्त्याकृत्या चतुर्मार्गम्।।४५।।''
(क्रमशः)

**– मधुकर गजानन दातार**

---

आज मी निदान एक पाऊल पुढे टाकीन, निदान एक काम पूर्ण करीन, निदान एक अडथळा ओलांडीन, निदान प्रयत्न तरी करीनच करीन.

# मानसिक आजारी व्यक्तींसाठी डॉ. अब्राहम लो यांची रिकव्हरी पद्धत

*अमेरिकेतील मनोविकारतज्ज्ञ डॉक्टर अब्राहम लो यांनी त्यांच्या अनुभवातून एक स्व-मदत पद्धत विकसित केली. त्यांनी विकसित केलेल्या या रिकव्हरी पद्धतीचा आढावा या लेखात दिला आहे. - संपादक*

मानसिक आजाराची लक्षणे नियंत्रणात ठेवून आजारी व्यक्तीच्या परिस्थितीत सातत्याने सुधारणा घडवून आणणे ही तशी एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे.औषधोपचार आणि मानसोपचार यांच्या मदतीने काही काळ मानसिक परिस्थितीत सुधारणा होते. परंतु अनेकांना ती टिकवून ठेवणे अवघड जाते. मानसिक आजारी व्यक्तींमध्ये टिकाऊ स्वरूपाची सुधारणा घडवून आणण्यासाठी स्व-मदत पद्धतीचा आणि स्व-मदत गटाचा खूप उपयोग होतो. अमेरिकेतील मनोविकारतज्ज्ञ डॉक्टर अब्राहम लो यांनी त्यांच्या अनुभवातून एक स्व-मदत पद्धत विकसित केली. त्यांनी विकसित केलेल्या या रिकव्हरी पद्धतीचा वापर आज जगभर केला जातो.



रिकव्हरी पद्धतीचे जनक असलेल्या डॉक्टर लो यांनी पोलंड मधून अमेरिकेत स्थलांतर करून इलिनॅाईस प्रांताच्या मनोविकार इस्पितळातून वैद्यकीय कारकीर्दीला सुरुवात केली. वैद्यकीय शास्त्राच्या वाचनाबरोबरच तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, मानसशास्त्र आणि साहित्य अशा विविध विषयांचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. त्यातूनच कोणत्याही व्यक्तीची जडणघडण, तिच्या प्रवृत्ती,प्रेरणा आणि बदलाचे स्रोत याचे एक वेगळेच आकलन त्यांना झाले, ज्याचा उपयोग पुढील आयुष्यात रिकव्हरी गटपद्धती विकसित करताना झाला.

त्यावेळेस म्हणजे १९३० चया सुमारास मनोविकारांवर फारशी प्रभावी औषधे नव्हती. अन्य उपचार पद्धती सुद्धा मर्यादित होत्या. शॉक ट्रीटमेंट हीच एक महत्त्वाची उपचार पद्धती होती. मानसिक आजारी व्यक्तींवर उपचार करत असताना डॉक्टर लो यांच्या असे लक्षात आले की, शॉक ट्रीटमेंटच्या उपचाराने अनेक रुग्णांची लक्षणे आटोक्यात येतात, त्यांना त्यांचा जीवनक्रम काही प्रमाणात तरी नव्याने चालू करता येतो आणि हॉस्पिटलमधून त्यांना डिसचार्ज दिल्यावर रुग्ण पुन्हा कुटुंबात येतात. परंतु लक्षणमुक्ततेची ही अवस्था फार काळ त्यांना टिकवून ठेवता येत नाही. दैनंदिन जगण्याचे ताणतणाव पुन्हा सुरू झाले की त्यांची पूर्वीची लक्षणे उफाळून येतात, पूर्वीचा आजार परत एकदा बळावतो आणि पुन्हा एकदा हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागते.

रुग्णांमध्ये होणारे हे चढ-उतार आणि त्यांचा त्रास पाहून डॉ. लो अस्वस्थ होत. रुग्ण हॉस्पिटलमध्ये असताना साध्य झालेली ही लक्षणमुक्त अवस्था कायम स्वरूपात कशी टिकून राहील यावर डॉक्टर लो यांनी प्रयोग सुरू केले. सूक्ष्म निरीक्षणातून त्यांच्या असे लक्षात आले की, रुग्ण संपूर्णपणे असहाय्य कधीच नसतो. काही प्रमाणात स्वतःची लक्षणे आटोक्यात आणणे

नेहमी तुमचे सर्वोत्तम प्रयत्न करा आणि हे करून देखील ते तुमची कदर करत नसतील तर तो त्यांचा दोष आहे; तुमचा नाही!

अनेक रुग्णांना शक्य असते. स्वतःच्या विचारांवर नियंत्रण ठेवणे, अस्थिर विचारांना लगाम घालणे आणि स्थिरता आणणारे विचार जाणूनबुजून आठवणे (रीकॉल) या गोष्टी रुग्णांना शक्य असतात. याप्रकारे रुग्ण स्वतःच स्वतःची मदत करू शकतो. उदा. आंतरिक शांतता टिकवणे माझे सर्वोच्च ध्येय आहे, माझे नियंत्रण फक्त अंतर्गत परिस्थितीवर आहे, बाह्य परिस्थितीवर नाही असे विचार वारंवार आठवल्याने राग, उद्वेग इत्यादींचा भावनिक आविष्कार रुग्णाला आटोक्यात ठेवता येतो. आजार उलटण्याची शक्यता कमी होते. अशा प्रकारे रुग्णाला शांतता व स्थिरता मिळवून देण्याबाबत सातत्याने निरीक्षण व प्रयोग करून डॉक्टर लो यांनी त्यांच्या रिकव्हरी पद्धतीची मूलभूत तत्त्वे अथवा मदत तत्त्वे (Recovery tools) विकसित केली.



या मूलभूत तत्त्वांना अनुसरून सुरुवातीच्या काळात डॉक्टर लो यांच्या देखरेखीखाली रिकव्हरी गटाच्या बैठका होत असत. यात प्रथम रुग्णाने त्याच्या बाबतीत घडलेला मानसिक प्रक्षोभाचा प्रसंग सांगायचा. नंतर डॉक्टर लो यांनी त्याचे विश्लेषण करायचे. रुग्णाने काय चूक केली आणि त्या विशिष्ट प्रसंगात काय करायला पाहिजे होते हे डॉक्टर सर्वांना समजावून सांगत. त्यांचे हे समजावून सांगणे इतके प्रभावी असायचे की, त्याचा फायदा अनुभवास येऊन रिकव्हरी गटाच्या बैठकांना मानसिक आजारी व्यक्तींचा मिळणारा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात वाढू लागला.

रिकव्हरीच्या प्रसारासाठी मात्र तो काळ अनुकूल नव्हता. सिगमंड फ्रॉईडच्या गहन मनोविश्लेषण पद्धतीने भारावलेला तो कालावधी होता. रिकव्हरी गटपद्धतीला मिळणारा वाढता पाठींबा इतर मानसोपचार तज्ज्ञांना अस्वस्थ करू लागला. ते डॉक्टर लो यांच्या रिकव्हरी सभांना विरोध करू लागले. त्यांनी हॉस्पिटल सोडावे म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यात आला. त्यांचा वैद्यकीय परवाना रद्द करण्यापर्यंत हा विरोध गेला.

आपल्या विरोधातील कारवायांमुळे हताश झालेल्या डॉ. लो यांनी रिकव्हरी गटच बंद करण्याचे ठरवले. परंतु अनेक रुग्ण रिकव्हरी पद्धतीचे फायदे अनुभवत होते. कोणत्याही परिस्थितीत गट चालूच ठेवण्याचा त्यांचा निर्धार लक्षात घेऊन डॉक्टर लो यांनी आपला विचार बदलला.

एक दिवस रिकव्हरी गटाची एक सभा नेहमीच्याच उत्साहाने सुरू होती. परंतु डॉक्टर लो यांना सभेला पोहोचायला उशीर झाला. दरम्यान रुग्णांनी सभेचे कामकाज सुरू केले होते. आपल्या उपस्थितीशिवाय रुग्ण सभा उत्तम रीतीने चालवत आहेत हे पाहून ते आनंदीत झाले. मानसिक आजारी व्यक्तींनी स्वतःहून सभा संचालित केली तर आपल्यावरील भार हलका होईल, तसेच रुग्ण स्वतःच रिकव्हरीचे गट चालवू लागले तर त्यातून अशा गटांची संख्या वाढून रिकव्हरी पद्धतीचा दूरवर प्रसार होईल हेही त्यांच्या लक्षात आले. आपल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी डॉक्टर लो यांनी रिकव्हरी संस्थेचे नियम, गट स्थापन करण्याची आणि त्याचे कामकाज चालवण्याची पद्धती यांची आखणी केली. मध्यंतरीच्या काळात आपल्यानंतर रिकव्हरी पद्धत पुढे कोण चालवणार या विचाराने लो यांना अस्वस्थ केले होते. ती चिंता आता राहिली नव्हती.

स्वतःची खाजगी प्रॅक्टीस असूनसुद्धा रुग्णांच्या मानसिक स्थितीतील चढ-उतार आणि त्रास कमी

कसा होईल आणि स्वप्रयत्नातून त्यांना शांतता, स्थिरता आणि संतुलन कसे मिळवता येईल हेच डॉ. लो यांच्या जीवनाचे ध्येय बनले. आयुष्यभर आपल्या रुग्णांसाठी झटणारा आणि त्यांना 'माय डीअर वन्स' या नावाने आपुलकीने संबोधणारे डॉ. लो यांचे १९५६ साली निधन झाले. परंतु मानसिक आजारी व्यक्तींना उपयुक्त अशी एक कालातीत स्व-मदत पद्धत ते पाठीमागे ठेवून गेले. आठवड्यातून एकदा असे नियमितपणे जमणारे जगभरातील सहाशेहून अधिक गट रिकव्हरी पद्धतीचा वापर करतात. गटांमध्ये रुग्ण स्वत:चा अनुभव रिकव्हरी पद्धतीच्या चौकटीत शेअर करतात. रिकव्हरीच्या सभांमध्ये नेमके काय होते ते आता बघू.



रिकव्हरीच्या मीटिंगमध्ये सर्व शुभार्थी जमिनीवर अथवा खुर्च्यांवर गोलाकार करून बसतात. रिकव्हरीच्या गटामध्ये उच्च-नीच भावनेला थारा नसतो. गटातील प्रत्येक जण, अगदी गटप्रमुख देखील स्वतःचा अनुभव अथवा अस्वस्थता आणणारा प्रसंग शेअर करतो. या गटामध्ये कोणीही सल्ला किंवा उपदेश करत नाही. प्रत्येक जण स्वतःचा अनुभव सांगून रिकव्हरी पद्धत कशी वापरली हे सांगतो.

**रिकव्हरीची मीटिंग कशी पार पाडली जाते?**

रिकव्हरी मीटिंगमध्ये सुरुवातीला नवीन सभासदांची ओळख आणि जुन्या सभासदांशी हलक्याफुलक्या गप्पा होतात, पूर्वीच्या कामांचा आढावा घेतला जातो. साधारणपणे पंधरा मिनिटे यामध्ये जातात. त्यानंतर रिकव्हरी पद्धतीचा मुख्य भाग चालू होतो.सुरुवातीला डॉ. लो यांच्या पुस्तकातील काही परिच्छेदांचे वाचन होते आणि त्यानंतर रिकव्हरी पद्धतीनुसार शेअरिंगला सुरुवात होते. ग्रुपमधील कोणीही घडलेला प्रसंग शेअर करू शकतो. कोणावरही शेअर करण्याचे बंधन नसते. साधारणपणे नुकताच घडलेला प्रसंग जो स्मरणात तपशिलासकट असतो असा प्रसंग चार टप्प्यात शेअर केला जातो. ते टप्पे असे -

**अस्वस्थता आणणारा प्रसंग अथवा घटना थोडक्यात स्पष्ट करा.**

पहिल्या टप्प्यामध्ये शुभार्थी अस्वस्थता आणणारा प्रसंग काय होता हे स्पष्ट करून सांगतो. मग कोणाबरोबर संवाद साधण्याचा प्रसंग असेल, परीक्षेत कसे होईल, पुरेसे मार्क मिळतील का हा विचार असेल, इतरांबरोबर लग्न-समारंभाला जाण्याचा प्रसंग असेल असे काहीही प्रसंग असू शकतील ज्यामध्ये ती घटना लक्षणे आणायला कारणीभूत (trigger) ठरते.

**अस्वस्थता आणणारी कोणती शारीरिक व मानसिक लक्षणे अनुभवाला आली?**

दुसऱ्या टप्प्यामध्ये मानसिक आजाराचा अथवा अस्वस्थतेचा अनुभव घेत असलेली व्यक्ती कोणती लक्षणे-शारीरिक व मानसिक- अनुभवायला आली हे स्पष्ट करून सांगते. मला घाम फुटू लागला, माझाआवाज कापरा होऊ लागला, पोटात गोळा आला, तिथून निघून जावे असे वाटू लागले, समोरच्या व्यक्तीचा राग आला, आपण कायमच अपयशी आहोत असे वाटू लागले इत्यादी. मानसिक आजाराचा अथवा अस्वस्थतेचा अनुभव घेत असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कमी-अधिक प्रमाणात अशा लक्षणातून जावेच लागते.

**रिकव्हरीची कोणती मदत-तत्त्वे वापरली?**

रिकव्हरीचा तिसरा टप्पा फार महत्त्वाचा आहे.अस्वस्थता आणणारी जी लक्षणे आहेत त्यांना तोंड देण्यासाठी रिकव्हरीची कोणती मदत-तत्त्वे वापरली (आठवली)हे या टप्प्यात सांगितले जाते. उदाहरणार्थ 'माझी मानसिक शांतता राखणे हे माझे सर्वोच्च ध्येय आहे' हे मदत-तत्त्व राग, भीती अथवा कमीपणाचे असे विचार व भावना मनात येत असतील तर आठवता येते अथवा रीकॉल केले जाते. इतरांच्या वागण्याचा त्रास होत असेल, ते आपल्याला समजून घेत नसतील, उद्धटपणाने वागत असतील तर 'बाह्य परिस्थितीवर माझे नियंत्रण नाही. माझे नियंत्रण फक्त अंतर्गत परिस्थितीवर आहे' हे तत्त्व वापरता येते. काही वेळेला रुग्ण कृती करायला तयार नसतो. त्यावेळेला 'स्नायूंवर नियंत्रण ठेवा'(Command your muscle) हे तत्त्व वापरून योग्य अशी कृती अस्वस्थता आणणाऱ्या प्रसंगात करता येते.

रिकव्हरीची अशी अनेक मदत-तत्त्वे आहेत जी डॉ. लो यांच्या लिखाणामधून आपल्याला मिळतात. या लिखाणात या तत्त्वांचे महत्त्व, त्याच्या अवतीभोवतीचे विचार आणि कशा पद्धतीने ही मदत-तत्त्वे काम करतात हे डॉक्टर लो स्पष्ट करून सांगतात.रिकव्हरीच्या पद्धतीतला हा महत्त्वाचा टप्पा आहे. अस्वस्थता आणणाऱ्या प्रसंगात अशी मदत-तत्त्वे वारंवार आठवणे ही एक सवयीची गोष्ट आहे. या मदत-तत्त्वांचा वारंवार वापर करून, ग्रुपमध्ये अनुभव शेअर करून ही सवय लावता येते. अस्वस्थता आणणाऱ्या प्रसंगातील उद्रेक नियंत्रणामध्ये आणता येतो. पुढे-पुढे ही सवय इतकी दृढ होते आणि एक वेळ अशी येते की, या चार टप्प्यांमधून देखील जायची आवश्यकता शुभार्थीला रहात नाही. रिकव्हरीची ही मदत-तत्त्वे त्या क्षणी आठवणे ही एक आपोआप होणारी अथवा नैसर्गिक अशी गोष्ट बनून जाते. रिकव्हरीच्या तत्त्वज्ञानातला हाच महत्त्वाचा भाग आहे. खूप मोठी सुधारणा एकदम घडेल अशी अपेक्षा ठेवणे हे चुकीचे आहे. रोज घडणाऱ्या लहान-लहान प्रसंगाला तोंड द्यायची क्षमता आणणे-सुरुवातीला प्रयत्नाने आणि मग आपोआपच-हाच रिकव्हरी पद्धतीचा आत्मा आहे.

**रिकव्हरी पद्धत वापरण्याच्या आधी आणि आता ही पद्धत वापरल्यामुळे काय बदल झाला?**

या चौथ्या टप्प्यामध्ये अस्वस्थता असणारी व्यक्ती रिकव्हरी पद्धत माहीत नव्हती तेव्हा स्वतःच्या अवस्थेत कसे बदल होत हे स्पष्ट करून सांगते. उदाहरणार्थ, इतरांचे बोलणे न आवडल्यामुळे मी मोठ्याने ओरडलो किंवा तिथून निघून आलो आणि मग माझे मलाच वाईट वाटत राहिले, माझा वेळ गेला आणि कामपण झाले नाही, कमीपणाची भावना मला वाटू लागली, आतल्या आत मी खदखदत राहिलो-अशी अनेक अपयशाची गाऱ्हाणी शुभार्थी शेअर करतो. सातत्याने अस्वस्थतेच्या झोक्यावर खाली-वर होत राहणे हाच शुभार्थीचा नित्यक्रम होऊन बसलेला असतो.रिकव्हरीची मदत-तत्त्वे वापरल्यामुळे माझा राग मी आवरू शकलो, माझ्या आंतरिक शांततेला मी महत्त्व दिले, या सर्व प्रकारात माझी काही चूक नाही हे मी ध्यानात घेतले, माझे काम शांतपणे मी केले आणि मी परत आलो अशा पद्धतीने शुभार्थी स्वतःचा अनुभव शेअर करतो.

**रिकव्हरीची तत्त्वे मी वापरली यासाठी मी मला शाबासकी देतो.**

चौथा टप्पा सांगितल्यावर उदाहरण देणारी व्यक्ती स्वतःला शाबासकी देते किंवा endorse करते. ही गोष्ट फार महत्त्वाची असते. आजाराच्या अवस्थेत माझ्या आयुष्यात काहीच चांगले घडत नाही, माझ्यात काहीच सुधारणा होत नाही अशा प्रकारची वृत्ती आजारी व्यक्तीची

कोणतेही कार्य हे अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करीत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते.

बनते. रिकव्हरीच्या माध्यमातून जे काही छोटे-मोठे बदल आजारी व्यक्तीमध्ये होत आहेत याचे कौतुक करणे महत्त्वाचे असते.यामुळेच व्यक्तीची आशा बळावते आणि ती कार्यप्रवण व्हायला उद्युक्त होते. आजारी व्यक्तीमध्ये टिकावू सुधारणा होण्यासाठी या सर्व गोष्टींची नितांत आवश्यकता असते. व्यक्तीचे उदाहरण संपल्यावर गटामधील इतर सभासद त्या व्यक्तीने सांगितलेल्या रिकव्हरी मदत-तत्त्वांपेक्षा इतर कोणती मदत-तत्त्वे वापरली आहेत ते त्या व्यक्तीच्या लक्षात आणून देतात. या सर्व प्रक्रियेत आजारी व्यक्तीचा आत्मविश्वास/ अनुभव दुणावतो आणि नवीन घटनेला तोंड द्यायला ती सिद्ध होते. छोट्या छोट्या घटनेतून माणसे घडत राहतात आणि सूक्ष्म का होईना झालेला बदल पुढील आयुष्याचा पाया रचत जातो. हॉस्पिटलायझेशन, शॉक्स घेतल्यानंतर आणि अन्य ट्रीटमेंट दीर्घकाळ घेतलेले रुग्णदेखील रिकव्हरीच्या माध्यमातून कसे बरे होतात हे लेखकाने अमेरिकेत तसेच भारतात देखील बघितले आहे.

**रिकव्हरी पद्धत काय शिकवते?**

रिकव्हरीचे विविध टप्पे आपण बघितले. हे टप्पे सोपे दिसत असले तरी प्रत्येक टप्प्यात वेगवेगळे विशेष फायदे मिळत असतात. घटना काय होती आणि अशा प्रसंगी माझी कोणती लक्षणे पुन्हापुन्हा दृगोचर होतात या पहिल्या दोन टप्प्यांमुळे आजारी व्यक्तीचे स्वत:विषयीचे, रोजच्या जीवनात घडणारे प्रसंग, त्यांचा स्वत:वर होणारा परिणाम, निरुपद्रवी प्रसंग कोणते आणि लक्षणे आणणारे (triggering) अथवा त्रासदायक कोणते या संबंधीची जाणीव अथवा स्व-जाणीव (self awareness) वाढायला मदत होते.

तिसऱ्या टप्प्यातून शुभार्थीला रोजच्या जीवनात घडणाऱ्या विविध प्रसंगांना रिकव्हरीची वेगवेगळी मदत-तत्त्वे आठवण्याची सवय लागते. 'अस्वस्थतेची लक्षणे त्रासदायक असली तरी धोकादायक नसतात', 'अपयश हा नेहमीच्या जीवनाचाच एक भाग आहे','जुनाट सवयी देखील प्रयत्नाने घालवता येतात','चूक करण्याचेही धाडस करा','लोकांच्या वागण्याचा आपल्याला त्रास होतो, पण त्रास व्हावा म्हणून कोणी मुद्दाम असे वागत नाहीत' किंवा 'यश मिळो वा न मिळो, केलेल्या प्रयत्नांबद्दल शाबासकी द्या' अशी असंख्य सोपी वाटणारी मदत-तत्त्वे त्या त्या प्रसंगाला चपखल उत्तरे देणारी (fit) अशी असतात. रिकव्हरीचे सौंदर्य या सोपेपणातच दडले आहे.

अस्वस्थतेला उतारा अशा स्वरूपात ही मदत-तत्त्वे काम करतात. खरंतर स्वत:च्यात सुधारणा व्हायला पाहिजे असे वाटणाऱ्या कोणत्याही सर्वसामान्य माणसाला देखील या मदत-तत्त्वांचा उपयोग होऊ शकतो. रिकव्हरी पद्धत वापरण्याआधी आणि नंतर या चौथ्या टप्प्यामुळे व्यक्तीला, 'मी करत असलेल्या प्रयत्नामुळे माझ्यात बदल काय होत आहेत' हे लक्षात येते आणि पुन्हापुन्हा प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा (reinforcement) मिळत राहते.

**रिकव्हरी पद्धतीची वैशिष्ट्ये कोणती?**

रिकव्हरी पद्धत रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या लहान-लहान घटनांचा विचार करायला शिकवते. अशा घटना ज्या रुग्ण प्रयत्न करून नियंत्रणात आणू शकतो. कोणत्याही सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे आजारी व्यक्तीला तिच्या संपूर्ण आयुष्याचा विचार करण्याची सवय असते. 'माझ्या बरोबरचे कोठे पोहोचले आहेत, मी आज कुठे आहे, माझे प्रश्न कसे सुटतील, मी चारचौघांसारखा कसा होईन' या पद्धतीने विचार करण्याची त्याला एक नैसर्गिक सवय असते. अशी सवय त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग असते. मानसिक अस्वस्थतेतून आरोग्याकडे वाटचाल करताना काही वेगळी पद्धत असू शकते हा विचार फारसा केला जात नाही. त्यामुळे

आत्ताच्या परिस्थितीला अनुकूल होणार नाहीत अशा अवाजवी अथवा अवास्तव अपेक्षा ठेवल्या जातात आणि त्याच्या दडपणानेच रुग्ण कोसळतो, कोसळत राहतो.

रिकव्हरी गट पद्धतीत आयुष्यातील इतर अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची म्हणजे कायदेशीर बाबी अथवा लग्न, नोकरी अशा गोष्टींची चर्चा गटात होत नाही. केवळ रोजच्या आयुष्यात घडणारे छोटे-छोटे प्रसंग आणि त्या संदर्भात रिकव्हरी पद्धत कशी वापरली हाच चर्चेचा फोकस असतो. कोणत्याही शुभार्थीचे मन आयुष्यातील भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्याभोवती घोटाळत असते. अशा सर्व प्रश्नांना एकदम तोंड देणे विशेषतः कमकुवत मानसिक अवस्था झालेली असताना सर्वस्वी अशक्य असते आणि मग 'मला जमत नाही, मला जमणार नाही' हाच नकारात्मक धोशा चालू राहतो. वर्षे अशीच जात राहतात आणि मग आयुष्यात पुन्हा उभारी घेणे अवघड होऊन जाते. रिकव्हरी विचारांचा फोकस एकदम बदलते. लहान-लहान अथवा शुल्लक दिसणाऱ्या घटनांच्या बाबतीत मी काय करू शकतो/शकते हे महत्त्वाचे असते. वरवर शुल्लक वाटणाऱ्या गोष्टी प्रत्येकालाच जमत असतात. उदाहरणार्थ, उदासीनता असताना देखील घराबाहेर पडणे, गोंधळलेले असताना देखील कपाटाचा एक छोटा कप्पा अथवा त्याचा भाग आवरणे, इतरांचा राग येऊन त्यांच्यावर ओरडावे वाटले असताना 'माझी मानसिक शांतता राखणे हे माझे सर्वोच्च ध्येय आहे ' हे लक्षात घेऊन शांत राहणे; अशा विविध गोष्टी अस्वस्थता असताना देखील करता येतात हे रिकव्हरी पद्धत लक्षात आणून देते.

थोडक्यात, नेहमीची विचार पद्धती 'मी अकार्यक्षम कसा आहे' हे फोकस करते, तर रिकव्हरी पद्धत 'मी करू शकतो, मी कार्यक्षम आहे, सभोवतालच्या गोष्टींवर माझेही नियंत्रण असू शकते' हे फोकस करते. थोडक्यात; असहाय्य, अपयशी, असुरक्षित अशा विचारांकडून आशादायक,सुरक्षित विचारांकडे रिकव्हरी पद्धत आपले लक्ष वेधते. असे छोटे-छोटे बदल मग जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात होऊ लागतात, छोट्या-छोट्या दगडांनी रांजण भरू लागतो आणि मग व्यक्तीचा उत्साह उत्तरोत्तर वाढत जातो. रिकव्हरी पद्धत शुभार्थीच्या विचाराची, वागण्याची भाषाच बदलते. 'मला काहीच जमत नाही' या भाषेकडून शुभार्थी 'मी लक्षणांना असे तोंड दिले, प्रयत्न तरी केले' अशी भाषा बोलू लागतो. सतत अशा वातावरणात राहिल्यामुळे ती भाषाच हळूहळू तिचा एक नैसर्गिक भाग होऊ लागते. रिकव्हरी पद्धत ही एक विचारपद्धत आहे, वातावरण आहे आणि जीवनविषयक दृष्टी आहे.

**सा मार्फत रिकव्हरीचे प्रशिक्षण –**

भारतात मानसिक आरोग्य क्षेत्रात मनुष्यसाधन संपत्तीची तीव्र टंचाई आहे. मनोविकार तज्ज्ञ तर कमी आहेतच, पण त्याहीपेक्षा मानसोपचार तज्ज्ञ आणि मानसिक सामाजिक कार्यकर्ते यांची टंचाई अति तीव्र आहे. त्यामुळे रिकव्हरी सारखी पद्धत उपलब्ध असेल तर अनेक रुग्णांना त्यांच्या लक्षणांशी सामना करून मानसिक आरोग्याकडे वाटचाल करता येईल. भारतामध्ये किमान जिल्ह्याच्या ठिकाणी रिकव्हरीचा ग्रुप चालू असायला पाहिजे की ज्यामुळे त्या भागातील अनेक लोकांना त्याचा लाभ होऊ शकेल. 'सा' च्या कार्यकर्त्यांनी रिकव्हरीच्या पद्धतीचे प्रशिक्षण अमेरिकेत जाऊन घेतले आहे. जर कोणाला अशा प्रकारचा ग्रुप चालू करायचा असेल तर'सा' तर्फे त्यांना प्रशिक्षण देता येईल.

**डॉ. अब्राहमं लो यांच्या रिकव्हरी मेथड मधील काही महत्त्वाची मदत तत्त्वे**

१. आंतरिक शांतता टिकवणे हे माझे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे.

२. अस्वस्थतेची लक्षणे त्रासदायक असली तरी धोकादायक नसतात.

(पृष्ठ क्र. २६ वर)

मनुष्याजवळची नम्रता संपली, की त्याच्या जवळची माणूसकीच संपली म्हणून समजावे.

# मॉस्को मेट्रो

*जगातली सर्वात सुंदर मेट्रो स्टेशन्स आणि प्लॅटफॉर्म्स म्हणून मॉस्को मेट्रो सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या २०० स्टेशन्सपैकी ४४ स्टेशन्स युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्य केलेली आहेत. या संदर्भात मॉस्कोतील मेट्रो स्टेशन्स भेटीचा रोचक प्रवास वृत्तांत लंडन येथून श्री. संकेत कुलकर्णी यांनी खास दिशाच्या वाचकांना पाठवला आहे – संपादक*

जगातली सर्वात सुंदर मेट्रो स्टेशन्स आणि प्लॅटफॉर्म्स म्हणून मॉस्को मेट्रो सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या २०० स्टेशन्सपैकी ४४ स्टेशन्स युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून मान्य केलेली आहेत. ह्यावरून त्यांच्या उच्च दर्जाची कल्पना यावी.



लंडन मेट्रोच्या १२–१३ वर्षांनंतरच – म्हणजे १८७५ मध्ये मॉस्कोमध्ये मेट्रो बनवायची योजना सुरू झाली होती. पण अचानक एक सरकारी नियम निघाला की, ज्या आर्किटेक्ट्सनी मेट्रोची डिझाईन्स म्हणून त्यांचे आराखडे पाठवले होते त्यांना बांधकामाची कंत्राटं देण्यात येऊ नयेत. मग काय – कामं बारगळली. १९०२ पर्यंत काहीच कामं सुरूही झाली नाहीत. त्यानंतर मग रशियाची जपानबरोबरची युद्धे, रशियन राज्यक्रांती, पहिलं महायुद्ध वगैरे गोष्टी होता होता मेट्रोच्या कामाला सुरुवात व्हायला १९३१ साल उजाडलं. १६–१७ व्या शतकांत बांधलेल्या एका मॉस्को कॅथेड्रल ऑफ ख्राईस्ट द सेव्हियर नावाचं एक कॅथेड्रल पाडायचं काम १९३१–१९३४ च्या सुमारास सुरू होतं. ह्या कॅथेड्रलमधला संगमरवरही मॉस्को मेट्रोच्या प्लॅटफॉर्म्समध्ये सुशोभिकरणासाठी वापरण्यात आला. मेट्रोचं हे काम सुमारे चार वर्ष चाललं. शेवटी १५ मे १९३५ रोजी पहिल्या १३ मेट्रो स्टेशन्सचं उद्‌घाटन झालं.

ही स्टेशन्स आणि प्लॅटफॉर्मस छान सुशोभित असले तरी नुसते दिखाव्याचे नाहीत तर वापरातलेही आहेत. दरवर्षी सुमारे २५० कोटी प्रवासी मेट्रो वापरतात. इतकं असूनही मॉस्को मेट्रो अतिशय काटेकोर वेळेवर चालते. गर्दीच्या वेळेस दर ९० सेकंदांनी ट्रेन्स असतात. इतकं असूनही ९९.९९% वेळा (म्हणजे सुमारे नेहेमीच!) मॉस्को मेट्रो वेळापत्रकानुसार चालते. ह्याबद्दलही ते जगात अग्रगण्य आहेत.


दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मनीची विमानं मॉस्कोवर बॉम्ब टाकत असतानाही ही मेट्रो कार्यरत होती. लंडनप्रमाणे इथेही लोक आसऱ्याला येत. त्यांची सोय म्हणून स्टेशन्समध्येच किराणामालाची दुकानं आणि केशकर्तनालयं उघडली गेली होती. युद्धादरम्यान सुमारे ५० लाख रशियनांनी ह्या स्टेशन्समध्ये आसरा घेतला होता. रशियनांना वाचनाची आवड इतकी की, युद्धादरम्यान कुर्स्कार्या स्टेशनमध्ये एक सार्वजनिक वाचनालयही सुरू करण्यात आले होते! रशियन राज्यक्रांतीच्या वर्धापनदिनी – ६ ऑक्टोबर १९४१ रोजी स्टॅलिनने जर्मनीचा पराभव करणारी इच्छा बोलून

दाखवणारे त्याचे प्रसिद्ध भाषणही मायाकोव्हस्काया स्टेशनवर केले होते.



लंडनप्रमाणे मॉस्कोतही एक गोल फिरणारी सर्कल लाईन आहे. (वरील नकाशा पहा.) असं म्हणतात की, मेट्रो सुधारणा कमिटीच्या एका मिटींगमध्ये स्टॅलिनने त्याचा कॉफीचा कप मेट्रोच्या नकाशावर ठेवला आणि त्या कपाची डागाची जी रिंग नकाशावर उमटली त्यावरूनच ह्या सर्कल लाईनची कल्पना सुचली. त्या लाईनवरच ही स्टेशन्स बांधली गेली आणि स्टॅलिनच्या कपाच्या डागाची आठवण म्हणून त्या लाईनचा रंगही नकाशात ब्राऊनच आहे!

मॉस्को मेट्रोतली अजून एक मला भावलेली कल्पना म्हणजे ट्रेनमधल्या आणि प्लॅटफॉर्मवरच्या अनाउन्समेंटस. ज्या ट्रेन्स बाहेरून मध्य मॉस्कोत जात असतात त्या ट्रेन्समध्ये पुरुषांच्या आवाजातल्या अनाउन्समेंटस होतात. आणि ज्या ट्रेन्स मध्य मॉस्कोतून बाहेरच्या दिशेने जात असतात त्यांमध्ये स्त्रियांच्या आवाजात अनाउन्समेंट होतात. म्हणजे समजा तुम्ही गडबडीत ट्रेन पकडली आणि दिशा चुकली असं कधीच होत नाही. कारण नेहेमी अनाउन्समेंट होऊनच ट्रेन निघते. पण सर्कल लाईन तर मध्य मॉस्कोतच गोल फिरते – तिथं काय? सोप्पं उत्तर आहे. ज्या ट्रेन्स क्लॉकवाईज फिरतात त्यांच्या अनाउन्समेंटस पुरुषांच्या आवाजात होतात तर ज्या विरुद्ध दिशेने फिरतात त्या स्त्रियांच्या आवाजात!



मॉस्को मेट्रोतल्या स्टेशन्स आणि प्लॅटफॉर्म्सवरील कलाकुसर – विशेषत: मोझाईक – खास पहाण्यासारखे. बाजूच्या भिंतींवरच नाहीत तर छतांवरही सुंदर मोझईक्स बनवलेले आहेत. ह्या मोझाईकमधले प्रसंग रशियाच्या इतिहासातले आणि विशेषकरून लेनिनच्या आयुष्यातले. ह्या मोझाईक भोवतालची संगमरवर आणि सँडस्टोनमधली अतिशय सुंदर कोरीव कामंही पहाण्यासारखी. प्लॅटफॉर्मसवरची विविध झुंबरंही खासच. इतके छान प्लॅटफॉर्म्स इतर गोष्टींसाठी वापरायचा मोह मॉस्कोकरांना

होऊ नये तर नवलच. गेल्या सात वर्षांपासून दर १५ मे रोजी मॉस्को मेट्रोत गाण्याचे पब्लिक कन्सर्टस होतात. बंद प्लॅटफॉर्ममुळे आवाजही नीट ऐकायला येतात आणि सोबत म्युरल्स, मोझाईक्स, डेकोरेशन्स आणि झुंबरं आहेतच!



८५ वर्ष जुनी असली तरी मॉस्को मेट्रो जुनाट मात्र नाही. २०१५ पासून सगळ्या लाईन्सवर ह्यूमन सेन्सर्स बसवलेले आहेत. म्हणजे कोणी माणूस रूळांवर चुकून किंवा मुद्दाम पडला तर त्याचा निर्देश ट्रेन ड्रायव्हरला आपोआप मिळतो आणि ट्रेनचा वेग त्यानुसार कमी होतो किंवा संपूर्ण थांबतो.

सध्या मॉस्को मेट्रोवर २६१ स्टेशन्स आहेत आणि एकूण ३८३ किलोमीटरचे लोहमार्ग आहेत. त्यांची अजूनही बरीच सुधारणांची कामे चाललेलीच आहेत. २०११ मध्ये सुरू झालेली ही कामे २०२० पर्यंत संपणे अपेक्षित आहेत. ह्यांत १६० किलोमीटरचे नवीन ट्रॅक्स टाकणे आणि नवीन ६० स्टेशन्स बांधणे वगैरे कामं केली जाणार आहेत.





सोबत मी काढलेले काही मॉस्को मेट्रोचे (विशेषत: कॉम्सोमोल्स्काया स्टेशनचे!) फोटो पोस्ट करतोय त्यावरून ह्या सगळ्याची कल्पना यावी. अशी ही मॉस्को मेट्रोची साठा उत्तरी कहाणी पाचा उत्तरी सुफळ (आणि सचित्र) संपूर्ण!

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

---

या दोन गोष्टींमुळे जग तुम्हाला ओळखते, ते म्हणजे तुमच्याजवळ काहीच नसतांना तुम्ही बाळगलेला संयम आणि तुमच्याजवळ सर्वकाही असतांना तुम्ही दाखवलेला रुबाब.

# अरुणा ढेरे यांची विलक्षण कलाकृती : कृष्णकिनारा..


*ज्येष्ठ लेखिका अरुणा ढेरे यांच्या 'कृष्णकिनारा' या नितांत सुंदर पुस्तकाचं विवेचक रसग्रहण प्रा. श्रीपाद जोशी यांनी प्रस्तुत लेखात केलं आहे- संपादक*

''कृष्णकिनारा वाचताना ३-४ वेळा माझ्या डोळ्यांची कड आपसूक ओली झाली'' हे एवढं एकच वाक्य ह्या पुस्तकाबद्दल लिहिताना पुरेसं आहे असं मला वाटतं.

'त्या' तिघींची कथा सांगताना अरुणाताई आपल्याला 'त्या' तिघींशी 'उराउरी' भेट घालून देतात.

त्या तिघी : राधा, कुंती, द्रौपदी...

ह्या तिघींवर बेतलेल्या तीन दीर्घकथा म्हणजे १०४ पानांचं नेटकं आणि अतिशय लोभस पुस्तक : 'कृष्णकिनारा'.




मुळातच पौराणिक कथांचे संदर्भ आजही अनेक कवी, लेखक आपल्या लिखाणात आणत असतात. अरुणाताई यांचं कौतुक एका गोष्टीसाठी मला करावं वाटतं ते म्हणजे 'कृष्णकिनारा' लिहिताना अरुणाताई बायकांचं रडगाणं लिहीत नाहीत तर त्यांचं असणं- नसणं लिहितात. अन्यथा पौराणिक कथांचा संदर्भ घेऊन आजच्या युगातली स्त्रीसुद्धा किती अबला वगैरे आहे असं ब्ला ब्ला बोलण्याची अनेक स्त्रीवादी लेखिकांना सवय आहे. अर्थात स्त्रीवाद आणि तदनुषंगाने लिहिलं जाणाऱ्या सर्व काही लिखाणाबद्दल मला आस्था आणि आदर आहेच. पण निदान 'कृष्णकिनारा' मध्येतरी अरुणाताई भूतकाळ आणि वर्तमान यांचा फारसा ऊहापोह करत नाहीत... याचा परिणाम असा होतो की, 'आजघडीचा काळ न उलगडताही सरतेशेवटी तो आपल्या मनात उलगडेल, आपण वाचक या नात्याने त्यावर विचार करायला लागू' अशी मोजकी वाक्ये अरुणाताई मोठ्या चलाखीने वापरतात. पौराणिक कथेचा 'essence' राखण्याचं कसब अरुणाताई कुठलीही सरमिसळ न करता करतात ही बाब आवर्जून नमूद करावीशी वाटते.

मला असं खूपदा वाटत आलं आहे की, 'राधा' हा शब्द तुमच्या काव्यात आला तरी त्या काव्याला एक परिमाण प्राप्त होतं. कृष्ण - राधा या नावाचा महिमाच असा आहे की, ही नावं उच्चारली किंवा कानावर पडली तरी पाण्यावर अलग तरंग उमटावे तसं काहीसं हृदयात होतं.

'कृष्णकिनारा' वाचताना मन गढून जातं. पात्रे

---

जिंकणे म्हणजे नेहमी फक्त पहिला येणे असे नसते; तर एखादी गोष्ट पूर्वीपेक्षा जास्त चांगली करणे म्हणजेच जिंकणे होय.

आपली वाटू लागतात.. आपण एका अद्‌भुत प्रवासाला निघालो आहोत असं वाटून जातं... अरुणाताई म्हणतात त्याप्रमाणे :

आपण निरखतो त्यांना, त्यांच्या भावजगताचा पैस आजमावू पाहतो, समजू पाहतो त्यांच्या स्त्रीत्वाची जातकुळी आणि पूर्णपुरुष कृष्णाच्या अथांग आयुष्याचा एखादा किनाराही...

पुढे अरुणाताई लिहित्या होतात आणि म्हणतात :

त्या तिघींची समजूत मोठी<br>
थोड्या इथे थबकतील,<br>
वर्तमानाला देऊन टाकतील त्याचं देणं,<br>
आणि काळाच्या दीर्घ अवघड वाटेनं<br>
पुढे जातच राहतील....

'कृष्णकिनारा' वाचताना मला एका वेगळ्या लाघव आणि 'राघव' शैलीत कथा वाचता आल्या. त्याचं कारणही अरुणाताईच. मी कॉलेजात असताना २-३ वेळा त्यांना ऐकण्याचा योग आला .. त्या ज्या पद्धतीने कथा, कविता वाचतात त्या शैलीत गढून जाऊन मी ह्या कथा वाचल्याने ह्या कथारूपी सागरावर लिलया संचार करू शकलो...

वयाच्या एका ठरावीक टप्प्यावर, प्रौढत्व आल्यावर ज्या त्या कथेत एकमेकांना भेटलेली ही पात्रे...

**पहिली कथा राधेची ...**

प्रतीहारी कृष्णाला सांगतो की, राधा आली आहे भेटायला... तेव्हा कृष्ण कुतूहलाने प्रश्न करतो.. : राधा आली आहे...? इथे..? या राजमंदिरात..? त्याची अस्वस्थता त्याला स्वस्थ बसू देत नाही आणि तो पुटपुटतो.

किती दिवसांनी पाहतो आहे हिला... दिवसांनी कसलं वर्षांनी.. युगांनी म्हटलं तरी चालेलं... जर ही राधाच आहे यावर विश्वास ठेवायचा तर फार बदलून गेली आहे..

चार हातावर लांब उभी राधा एकदम हसते आणि हनुवटी उचलून विचारते ... काय बघतो आहेस..?

अशी ही कथेची सुरुवातच इतकी हृदयंगम आहे की क्षणार्धात माणूस कथेमध्ये मग्न होऊन जातो...

'कृष्ण' हे नावच आपल्याला पुरेसं आहे.. त्याने न कसला थांगपत्ता लागू दिला; कधी न तो कधी चलबिचल झाला... पुरून उरतो सगळीकडे..

राधेला म्हणतो :

किती बघतो आहेस...? असं विचारायची तुझी सवय.

राधा एकदम उभी थरथरते आणि म्हणते,

'म्हणजे तू... विसरला नाहीस ..?'

कृष्ण बोलून जातो, 'कधी भेटू तुला, सांग आणि कुठे...?'

'तस्साच मनकवडा आहेस रे अजून..! खरंच भेटशील..? अरे तेवढ्यासाठी तर आले... इतकं अंतर एरवी ...' राधा उत्तरते.

आणि कृष्ण म्हणतो, 'उद्या. समुद्रकाठी. असंच दिवेलागणी नंतर. तिथे एक देऊळ आहे बघ छोटंसं.. तू तिथे थांब ...'

राधा निघून जाते खरी . पण फक्त पाठमोरी दिसलेली राधा रुक्मिणीचा ठाव घेते ... रुक्मिणी कृष्णाला विचारते, 'सांगा ना ती कोण होती..?'

'राधा'... कृष्ण उत्तरतो.

अरुणाताई कथा पुढे सरकवत असताना रुक्मिणीची

घुसमट मोठ्या ताकदीने मांडतात आणि लिहून जातात:

'राधा या शब्दाचा उच्चार त्याच्याइतका तिलाही कधी सोपा वाटला नव्हता. दोघांपैकी कुणीच तो शब्द कधी उच्चारला नव्हता... अगदी आजपर्यंत...'

आणि मग द्रौपदीसमोर 'राधा' शब्द एकदा उचारल्याचं देखील रुक्मिणीला आठवून जातं... ती तेव्हा म्हणालेली असते...

नाही द्रौपदी. मी तृप्त नाही.कधी कधी असं वाटतं की, आमचं प्रेम; आमचा शृंगार,आमचा संसार – हे सगळं तसं फार हेवा करण्याजोगं असूनसुद्धा कुठे तरी काही तरी चुकतं आहे. काहीतरी निसटलंच आहे माझ्या हातून...

आता एवढ्या दिवसांनंतर कृष्णाच्या तोंडून 'राधा' शब्द ऐकून रुक्मिणी तडफडून म्हणते :

मला भेटायचंय तिला.. एकदा तरी ती भेटावी म्हणून कितीक वर्षे तळमळले आहे मी...

कृष्णाकडून वचन घेते रुक्मिणी राधेच्या भेटीचं...

अखेर कृष्ण आणि राधा यांची समुद्राकाठची ती भेट... समुद्रावरची उतरती संध्याकाळ एवढी एकटी असते आणि एवढी अमर्याद असते हे राधेला ठाऊकच नव्हतं... ह्या एका वाक्यातून अरुणाताई सगळा प्रसंग (राधा, कृष्ण, समुद्र, संध्याकाळ) आपल्यासमोर उभा करतात आणि राधेप्रमाणेच आपणही समुद्राची तुलना राधा कृष्णाच्या प्रेमाची साक्षीदार असलेल्या 'यमुनेशी' करायला सुरवात करतो..

राधेची हुरहूर आपल्यासमोर येते.. तिला वाटून जाते :

अदृष्टाच्या वाटेवरची ही भेट काय दाखवणार आहे मला...? कुठे वळवणार आहे...?

कथा वाचत जाऊ तसा राधा–कृष्णाचा संवाद खुलत जातो.. राधा लाडीकपणे कृष्णाची बोटं हळूहळू आपल्या ओंजळीत ओढून घेते व म्हणते..

बासरी आणली असतीस, तर वाजवली असतीस रे पुन्हा...!

आणि त्यावर कृष्णाचं उत्तर :

वेडाबाई ... गोकुळातून निघालो ... तू ती जी हिसकावून घेतलीस, तिच्यानंतर पुन्हा कधी बासरी आलीच नाही माझ्या हातात.. मला वाजवायची नव्हती म्हणून मग मिळवलीही नाही मी ती फार अट्टाहासानं...

संवाद इतका खुलत जातो पुढे की राधा डोळ्यांत पाणी येईतो हसते....

मनकवडा कृष्ण राधेचं कौतुक करत म्हणतो की, तुलाच गं बाई...तुलाच उलगडलं... मी नंतरसुद्धा नव्यानव्यानं...

आता इथे मला कथा सांगण्याचा मोह होतोय. पण माझा उद्देश तो नाहीच आहे मुळी...एक गोष्ट बाकी खरी की, अरुणाताई समुद्रकिनाऱ्यावर राधा आणि कृष्णाची भेट आपल्या डोळ्यांदेखत घडवून आणतात.

राधेचा आणि कृष्णाचा संवाद आपण अगदी अंतर्मुख होऊन वाचत बसतो. मग कधी राधेची क्षमा मागणारा कृष्ण समोर येतो; तर... मी कोण तुला क्षमा करणारी..असे भावोद्‌गार काढणारी राधा आपल्या हृदयाला कळवळून सोडते.

पुढे राधेच्या तोंडून अरुणाताई लिहितात...

प्रेम फार जहरी असतं रे... फार कडू असतं गिळायला.. आणि हा टिपिकल डायलॉग उरत नाही; कारण ह्याच वाक्याला जोडून पुढे राधा बोलते.. मला

भूक आहे तेवढे खाणे ही प्रकृती, भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती आणि वेळेप्रसंगी स्वतः उपाशी राहून दुसऱ्याची भूक भागवणे ही संस्कृती..

विचार.. तुला गिळता गिळता माझा रंग बदलून गेला बघ, पाहतो आहेस ना..?

राधा कृष्णाचा चेहरा बघून त्याला पूर्णपुरुष म्हणून चिडवते आणि बोलून जाते, पूर्वीच्या त्या तुझ्या अनिश्चित हलत्या आणि बदलत्या नाकाडोळ्यांवर किती जीव टाकला आहे मी..! कृष्ण उत्तरतो, चल होऊ का मग तसाच मी पुन्हा... आणि बावरी राधा उच्चारते... चेष्टा नको रे...तू जरी तसा झालास तरी मी झालेय जगून जगून जुनी... तुझं नवेपण सोसणार आहे का मला...?

राधेकृष्णाचा हा संवाद पुढे कधी लडिवाळ, तर कधी खट्याळ, कधी रुसलेला, तर कधी फुगलेला, कधी भांडण, तर कधी अबोला आणि 'राधाकृष्ण' नाव जोडून लिहिलं जावं तसा एकसंध एकरूप होऊन जातो. प्रतीहारीने विचारलं होतं कोण आलंय म्हणून सांगू, तेव्हा पहिली बायको आली आहे... असं सांगायचं असं जेव्हा लबाड कृष्ण बोलतो तेव्हा राधा चिडून म्हणते– खूप बोललास...आधी मला बोललेलं वाक्य परत घे.. थट्टेतही बोलू नये रे आपण...

तिला माहित्येय की कृष्ण इतका सरळ कधीच नाहीये.

इतक्या वर्षानंतरही राधेच्या प्रेमाचा रंग जराही फिकट होत नाही. अरुणाताई एकेठिकाणी प्रचंड लाघवी आणि अगदी राधेच्या मनातला संवाद लिहून जातात..

होय रे श्रीरंगा... मी अजूनही खेळते जुने खेळ. मी अजून कधीतरी सूर्य बुडाल्यावर जाते यमुनेवर. पाणी आणायचं नसतं आता. नुसतीच जाते. कदंबाखाली बसते थोडा वेळ. डोळे मिटून तिथे बसलं की वाटतं, कुठून तरी सख्यांचा आवाज येईल 'साई सुट्ट्यो' म्हणून मग मी उठेन, त्यांना शोधत जाईन इकडे तिकडे आणि अचानक एखाद्या झाडामागून तूच पकडशील माझा हात, ओढून घेशील आणि नेशील तिकडे वेळूमध्ये. सख्या वेड्या लपलेल्या तशाच. माझी चाहूल घेत. आणि मग...

असे असंख्य लाघवी, अंगावर शहारे उमटविणारे प्रसंग अनुभवायचे असतील तर कृष्णकिनारा आवर्जून वाचायलाच हवं...

दुष्ट वाटणाऱ्या आणि पुन्हा आभाळासारखादेखील भासणाऱ्या कृष्णाला राधा अधिकारवाणीने बोलू शकते.तू इथवर आलीस कशी... एवढ्या दूर... असं विचारताच राधा हसत हसत म्हणते :

ते तुझ्या दुःखाचं देणं आहे बाबा... असलंच काही तर तुझंच देणं आहे..

पुढे कथा वाचता वाचता कृष्णाचा लहान मुलासारखा एक प्रश्न समोर येतो.

राधे .. एक सांग, मधल्या इतक्या वर्षात सुखी होतीस ..?

उत्तर द्यायला कोणी ऐरेगैरं नाही; तर स्वत: राधा आहे. राधेनं दिलेलं उत्तर आपण वाचावं आणि डोळ्यांतून टपकन थेंब पानावर पडावा असं आहे हे सगळं...

अरुणाताई कथा सांगताना खूप काही मोलाच्या गोष्टी सांगून जातात..जसे की :

बाई आई होते तेव्हा तिला मुक्तीची वाट जेवढी जवळ असते ना, तेवढी इतरांना नाही..

खूप काही लिहिता येईल पुस्तकाबद्दल. ही तर फक्त पहिली कथा... तितक्याच ताकदीने अरुणाताई कुंती आणि द्रौपदी यांचीही मनं पुढच्या दोन कथांमध्ये उकलतात..

'राधा' ही पहिली कथा वाचताना आपण कथेचे

कधी होऊन जातो तेच कळत नाही... राधेचं तळमळून मनोमन उद्गारणं :

पुढच्या जन्मी पोटी ये कृष्णा ...!

कथेच्या प्रवाहात झोकून दिल्यानंतर हे वाक्य वाचून आपल्या हृदयात कालवाकालव होते.. मन पिळवटून निघतं...

कथेच्या शेवटाकडे आपण येतो आणि कथा संपून झाल्यानंतर कृष्णमय आणि राधामय होऊन जातो.. अरुणाताई कथेचा शेवट करतात..

कृष्ण म्हणाला – 'येतो राधे.'

अन् राधा चमकली. 'निरोप मी घ्यायचा कृष्णा. मी आले आहे तुझ्याकडे...की भलतंच काही आहे तुझ्या मनात..?'

पण आता कृष्ण उत्तर द्यायला तिथे थांबलाच नाही. मागे वळूनही न पाहता तो झपझप चालत दूर जात राहिला...

त्याला पाठमोरं पाहताना राधेला दाटून आलं. त्या अजूनही निरंजन किनाऱ्यावर ती एकटीच त्याला पाठमोरं पाहात होती.. एकटी नव्हे... खरं म्हणजे ते विलक्षण दृश्य बघण्यासाठी सूर्य आता क्षितिजावर येऊन उभा राहिला होता...

**– प्रा. श्रीपाद जोशी**
गोरेगाव, मुंबई
भ्रमणध्वनी : ९७३०७३०२२२

•••



(पृष्ठ क्र.१८ वरून-**मानसिक आजारी व्यक्तींसाठी डॉ. अब्राहम लो यांची रिकव्हरी पद्धत**)

३. बाह्य परिस्थितीवर माझे नियंत्रण नाही, पण माझ्या स्वतःच्या मनावर मी ताबा ठेवू शकतो.

४. अपयश हा नेहमीच्या जीवनाचाच एक भाग आहे. मी एक सामान्य व्यक्ती आहे.

५. भावना किंवा मला जे वाटते ते वस्तुस्थिती नव्हे.

६. माणसांच्या वागण्याचा आपल्याला त्रास होतो पण आपल्याला त्रास द्यावा म्हणून मुद्दाम कोणी तसे वागत नसते.

७. मानसिक आजार नशिबाचा भाग आहे. स्व–निर्मित नाही.

८. जुनाट सवयी देखील प्रयत्नांनी घालवता येतात.

९. चुका करण्याचेही धाडस करा.

१०. यश मिळो वा न मिळो, केलेल्या प्रयत्नांसाठी स्वतःला श्रेय देऊन कौतुक करणे महत्त्वाचे.

११. घडून गेलेल्या गोष्टींबद्दल खंत करू नका किंवा भविष्यकाळात काय होणार आहे याची भीती बाळगू नका.

१२. भीतीमुळे लक्षणे व लक्षणांमुळे भीती निर्माण होते.

१३. स्वतःच्या भावना व कृतीवर ताबा ठेवण्यासाठी केलेली प्रत्येक गोष्ट आत्मसन्मान वाढवते.

१४. शांतता, सुव्यवस्था व समतोल ही यशस्वी जीवनाची त्रिसूत्री आहे.

१५. आपण स्वताःवर अपेक्षांचे ओझे लादले तर त्यातून अपेक्षाभंग व निराशा निर्माण होतात.

(आभार : गुरुदत्त कुंदापूरकर – 'सा' चे माजी उपाध्यक्ष आणि गोवा येथील 'दैनिक हेराल्ड' वृत्तपत्र.)

**– प्रा. अनिल वर्तक**
उपाध्यक्ष,
स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोशिएशन
भ्रमणध्वनी : ९५०३७१०८५९
Email : avartakyahoo.com

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

### दिव्यांची अवस

आषाढ अमावस्या म्हणजेच दिव्यांची अमावस्या होय. सर्वांच्या आयुष्यातील अंधःकार नष्ट करून ज्ञान, आरोग्य, ऐश्वर्य, शांती व सौख्याचा प्रकाश जीवनात अविरत प्राप्त करून देणाऱ्या दिव्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जुलै २०१९ रोजी दीपपूजा साजरी केली. टेबलावर विविध प्रकारच्या दिव्यांची मांडणी केली होती. दीपपूजेचे महत्त्व, प्रार्थना, गाणी घेण्यात आली.

तसेच इयत्ता दुसरीच्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रकाशपिता सूर्य यांना स्मरून ज्योतीध्यान केले व प्रकाश प्रार्थना सादर केली. कु. अंकुश महाडीक या विद्यार्थ्याने सूर्यनमस्काराचे महत्त्व सांगितले व १२ सूर्यनामे म्हणून दाखवली.

कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

### आषाढी एकादशी

देखीला कळस, डोविला तुळस<br>
धावितो चंद्रभागेसी,<br>
समीप ही दिसे पंढरी, याच मंदिरी माउली माझी<br>
माउली, माउली, माउली, माउली.

गुरुवार दिनांक ११/७/२०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे, डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभागातील इयत्ता १ ली ते ४ थीचे विद्यार्थी विठू माउलीचा जयघोष करीत माउलीच्या दिंडी सोहळ्यात बाल वारकरींच्या रूपात उत्साहाने सहभागी झाले.

विठ्ठल रुक्मिणी यांची पूजा व आरती झाल्यानंतर संत वारकरी मंडळीनी दिंडी काढली. यावर्षी आषाढी एकादशी निमित्ताने इयत्ता २ री (५) च्या विद्यार्थ्यांनी 'तुळशीदान' सोहळा उत्साहात साजरा केला.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी स्वतः घरी लावलेली तुळस उपस्थित नागरिकांना व पालकांना दान केली. तसेच आषाढी एकादशीची माहिती, तुळशीमातेचे महत्त्व कु. आदित्य खोत या छोट्या बाल वारकऱ्याने सुंदररित्या आपल्या भाषेत मांडले.

झाडांचे महत्त्व तसेच झाडे लावा, झाडे जगवा अशी अनेक घोषवाक्ये कु. अधिराज मोहिते या बाल वारकऱ्याने सादर केले.

या शालेय उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच पालक व इतर नागरिकही मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. आमच्या शाळेची ही बाल वारकऱ्यांची वारी म्हणजे मूल्यसंस्कार, शिक्षण आणि श्रद्धा यांचा जणू त्रिवेणी संगमच जुळून आला. मा. मुख्याध्यापिका सौ. कुडव बाईंचे उत्तम मार्गदर्शन या कार्यक्रमास लाभले. लोकमत या वृत्तपत्राद्वारे याचे चित्रीकरणही करण्यात आले.

### गुरुपौर्णिमा

जन्म घेतल्यानंतर प्रत्येक मानवाला जीवन जगतांना आध्यात्मिक ज्ञान प्राप्तीसाठी व परमेश्वराचे सानिध्य लाभण्यासाठी जीवनात गुरूची आवश्यकता असते. आपल्या गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा होय. जन्मदाते आई-वडील, प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, समाज व व्यावसायिक शिक्षक आणि आपल्या जीवनातील वाटचालींबद्दल मार्गदर्शन करणारे आध्यात्मिक गुरू अशा पाच प्रकारच्या गुरूंबद्दल आदर व्यक्त करणारा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा होय.

आषाढ महिन्यातील पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा म्हणून साजरी करतात. मंगळवार दिनांक १६/७/२०१९ रोजी प्राथमिक विभागातील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा केला.

मा. मुख्याध्यापिका सौ. कुडव बाईंनी श्री. दत्तगुरु महाराजांच्या प्रतिमेची मनोभावे पूजा केली. गुरुवर्य श्री व्यास ऋषीमुनी लिखीत श्रीमद् भगवद्गीतेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी गुरूने दिला ज्ञानरूपी वसा हे गाणे चालीत म्हणून मा. मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांना मनोमन वंदन केले. तसेच विद्यार्थ्यांनी गोष्टी, भाषणे, गाणे इत्यादी मधून गुरूंबद्दल आदर व्यक्त केला. मा. मुख्याध्यापिका सौ. कुडव यांनीही आपल्या मार्गदर्शनात गुरूंची महती सांगितली.

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून या वर्षीही इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी आपला पहिला गुरू म्हणजे ‘आपली माता’. मातेच्या चरणांची रीतसर पूजन करून आपल्या मातेला वंदन केले. उपस्थित मातांनी देखील प्रसन्न मनाने मुलांना शुभ आशीर्वाद दिले.

पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

मराठी पंचांगातील पवित्र आणि धार्मिक महिना श्रावण २ ऑगस्टपासून सुरू झाला. ह्या महिन्यात येणारे सण नागपंचमी, स्वातंत्र्यदिन, नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन, दहिहंडी सौ. ए. के. जोशी पूर्व – प्राथमिक विभागात उत्साहात साजरी करण्यात आली.

**५ ऑगस्ट –** नागपंचमी ५ ऑगस्टला साजरी करण्यात आली. सामूहिक प्रार्थनेत शिक्षकांनी मुलांना शेताच्या प्रतिकृतीच्या सहाय्याने नाग शेतकऱ्याचा कसा मित्र आहे ह्याची थोडक्यात माहिती सांगितली. तसेच तो दूध पीत नसल्यामुळे पूजा करताना त्याला दूध देऊ नये असा संदेशही दिला. नंतर नागाच्या मूर्तीची पूजा करून बत्ताशाचा प्रसाद मुलांना देण्यात आला. नर्सरी व ज्युनिअरच्या मुलांनी चिकणमातीचे नाग केले आणि सिनिअरच्या मुलांनी क्राफ्ट पेपरचे नाग केले.

**१४ ऑगस्ट –** स्वातंत्र्यदिन, नारळीपौर्णिमा आणि रक्षाबंधन १४ ऑगस्टला एकत्र साजरी करण्यात आली. नर्सरीच्या मुलांनी झेंड्यांचे रंग असलेले कपडे घातले होते; तर ज्युनिअर, सिनियरची मुले स्वातंत्र्य सैनिक व महान नेते बनून आले होते.

**स्वातंत्र्य दिन –** शिक्षकांनी मुलांना स्वातंत्र्यदिनाची थोडक्यात माहिती सांगितली. १५ ऑगस्ट रोजी भारताचे पंतप्रधान लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करतात. मुलांना स्वातंत्र्यसैनिकांची चित्रे दाखवून त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती सांगितली. तसेच त्यांना राष्ट्रध्वजाचा आदर करण्यास सांगितले. मुलांनी देशभक्तीपर गीते गाइली.

**नारळीपौर्णिमा, रक्षाबंधन –** समुद्राला नारळ वाहून त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा नारळीपौर्णिमा हा सण. सामूहिक प्रार्थनेत त्याचे महत्त्व थोडक्यात सांगितले. झाडांचे मानवी जीवनातील महत्त्व, झाडांची निगा कशी राखावी आणि जास्तीत जास्त झाडे लावून पर्यावरणाचा समतोल कसा राखावा ह्याची थोडक्यात माहिती शिक्षकांनी मुलांना दिली. मुलांनी झाडाला राखी बांधून आपली कृतज्ञता व्यक्त केली. पाळीव प्राणी आपल्याला विविध प्रकारे मदत करत असतात. सिनियर केजी विभागातील विद्यार्थ्यांचे पालक श्री. नचिकेत परांजपे यांनी आपला पाळीव कुत्रा ‘टायसन’ आणला होता. ‘पाळीव प्राणी आपले मित्र आहेत’ ह्याचे प्रतीक म्हणून मुलांनी टायसनला राखी बांधली. नर्सरी, ज्युनियरच्या मुलांनी पालकांच्या मदतीने तर सिनियरच्या मुलांनी शिक्षकांच्या मदतीने तयार केलेल्या राख्या बांधल्या. गोड नारळ वडीचा प्रसाद दिला गेला.

---

जगा इतके की आयुष्य कमी पडेल, हसा इतके की आनंद कमी पडेल, काही मिळाले तर नशिबाचा खेळ आहे, पण प्रयत्न इतके करा की परमेश्वराला देणे भागच पडेल.

**२३ ऑगस्ट** – दहीहंडी २३ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. पूर्व प्राथमिक विभागाला बाल राधा – कृष्णांमुळे वृंदावनाचे रूप प्राप्त झाले होते. सामूहिक प्रार्थनेत मुलांना शिक्षकांनी कृष्णजन्माष्टमीची आणि दहिहंडीची थोडक्यात माहिती व गोष्ट सांगितली. शिक्षकांच्या मदातीने मुलांनी मानवी मनोरा रचून दहीहंडी फोडली. नंतर मुलांना दहीकाल्याचा प्रसाद देण्यात आला. शिक्षकांच्या मदतीने तयार केलेले मयुरपंख मुकुट नर्सरीची मुले घालून गेली; तर ज्युनिअर, सिनियरच्या मुलांना स्वतः रंगविलेले दहीहंडीचे चित्र ह्या उत्सवाची आठवण म्हणून देण्यात आले.

यंदाच्या वर्षी महाराष्ट्रात आलेल्या नैसर्गिक आपत्तीचे भान ठेवून केवळ मुलांच्या माहितीसाठी श्रावण महिन्यातील सर्व सण शाळेत पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करण्यात आले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### संस्कृत सप्ताहाचे उद्‌घाटन



दि.१६/८/२०१९, शुक्रवार रोजी संस्कृत विभागातर्फे संस्कृत सप्ताहाचे उदघाटन आणि संस्कृत प्रतिष्ठिका अभ्यासक्रमाचा समारोप उप-प्राचार्य प्रियंवदा टोकेकर यांच्या हस्ते करण्यात आला.

(Add On course for 15 Days and Bridge course for 7 Days)

महाविद्यालयातील आणि महाविद्यालय बाह्य मंडळींसाठी हा अभ्यासक्रम घेण्यात आला होता. यात एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आज उप–प्राचार्या प्रियंवदा टोकेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या सर्व उपक्रमात उत्साहाने सहभागी व्हावे यादृष्टीने उप–प्राचार्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी स्पर्धेत सहभागी होण्यास, स्पर्धेचे स्वरूप कसे असावे याबद्दल देखील उत्तम कल्पना सुचविल्या. मॅडमच्या मार्गदर्शनामुळेच काही विद्यार्थ्यांनी उत्साहाने स्पर्धेत नावे नोंदवली.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या कल्पनेमुळेच आणि मार्गदर्शनामुळे वयाचे बंधन न ठेवता हा अभ्यासक्रम विभागाने सर्वांसाठी खुला केला. त्यामुळे काही ज्येष्ठ मंडळींनी देखील यात सहभाग घेतला होता.

विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी १२ तास आणि इतर विद्यार्थ्यांना ३० तास या कालावधीत हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला.

१६ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट कालावधीत संस्कृत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

हे सर्व उपक्रम यशस्वी होण्यास प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे विभागास अशा प्रकारचे विविध कार्यक्रम आयोजित करणे शक्य आहे.

### ख्रिसलीस २०१९: यूट्युबर्स मीट

तुषार खेरच्या 'आला मोटा शाना' या यूट्यूब चॅनेल वर किमान ३० लाख सबस्क्राईबर अर्थात प्रेक्षक आहेत. त्याच्या यूट्युब चॅनेलच्या चमुला यूट्युबर्स मीट या कार्यक्रमात २१ ऑगस्ट, २०१९ रोजी बोलावण्यात आले होते. महाविद्यालयाच्या विना अनुदानित विभागाचा



ख्रिसलीस हा अंतरमहाविद्यालयीन महोत्सव मागच्या १० वर्षांपासून भरवण्यात येतो.

**ख्रिसलीस २०१९ उद्घाटन समारंभ**



२३ ऑगस्ट २०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात ख्रिसलीस २०१९ या आंतरमहाविद्यालयीन महोत्सवाचे उद्घाटन झाले. ख्रिसलीस शब्दाचा अर्थ 'कोशात असलेला सुरवंट ज्याचं फुलपाखरात रूपांतर होते.' या महोत्सवात मुंबई व ठाण्यातील बहुसंख्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन क्षेत्रातील अभ्यासक श्री. शुभ्रअरविंद बिराबर उपस्थित होते व व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, ख्रिसलीस समन्वयक डॉ. संगीता दास, उप-समन्वयक तृप्ती कौतिकवार उपस्थित होत्या. या वर्षीचा ख्रिसलीस महोत्सव शाश्वत विकास (sustainable development) या विषयावर समायोजित करण्यात आला.

डॉ. संगीता दास यांनी ख्रिसलीस महोत्सवाच्या एकूणच संकल्पना विशद केल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ- सुचित्रा नाईक आपल्या भाषणात म्हणाल्या की, शाश्वत विकास हा मानवी संवेदनांचा व भावनांचा एकात्मिक परिपाक असतो. व्यक्तीला विकासाच्या वाटेवर मानवी मूल्यांची अत्यंत गरज आहे. जो स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात समतोल राखतो तोच चांगला व्यवस्थापक (Manager) होऊ शकतो.

विज्ञान, वाणिज्य व प्रबंधन क्षेत्रात नैतिक मूल्यांची आत्यंतिक गरज आहे असं डॉ. नाईक म्हणाल्या.

अतिथी श्री. शुभ्रअरविंद बिराबर म्हणाले की, आपण सर्वजण प्राणांतिक स्पर्धेच्या युगात वावरत आहोत. ते म्हणाले की, Even if you win the rat race, You're still a Rat.

स्पर्धा व यशाच्या मागे लागलेल्या आपणा सर्वांना आनंद व सुखाची प्राप्ती झाली पाहिजे. हॅपिनेस इंडेक्स मध्ये भारत हा पाकिस्तान व भूतान या देशांच्याही खाली आहे. ज्या प्रमाणे एखादं फुल उमलतं तेंव्हा त्याचा सुगंध आपसूकच यायला लागतो, फुलाला आपल्या सुगंधाची जाहिरात करावी लागत नाही. त्याप्रमाणे यशस्वी व्यक्ती होण्यासाठी स्वतःमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणावा लागेल तेंव्हाच त्याच्या कीर्तीचा सुगंध येईल. व्यक्तीच्या विकासात त्याचा आध्यात्मिक विकास होणे फार महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन श्री. शुभ्रअरविंद यांनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

**संस्कृत सप्ताहाचे आयोजन**

१६ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट या कालावधीत संस्कृत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या

अंतर्गत आंतर महाविद्यालयीन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या सर्व उपक्रमास यशस्वी होण्यास प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत असल्यामुळे विभागास अशा प्रकारचे विविध कार्यक्रम आयोजित करणे शक्य आहे.

**सप्ताहातील स्पर्धांचा आढावा :-**
**दिनांक १९/०८/२०१९, सोमवार**

संस्कृत सप्ताहाच्या अंतर्गत गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण २२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे निर्णायक डॉ. प्रशांत धर्माधिकारी होते.

२१/०८/२०१९, बुधवार रोजी संस्कृत सप्ताहा अंतर्गत प्रश्न मंजूषा स्पर्धा घेण्यात आली. यात एकूण ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

श्री. पंकज ठोंबरे यांनी परीक्षकाची भूमिका पार पाडली.

२२/०८/२०१९, गुरुवार रोजी संस्कृत क्रीडा आयोजित करण्यात आली. विभागाच्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडांचा यावेळी आनंद घेतला.

२३/०८/२०९ शुक्रवार रोजी श्लोक पठण स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विभागाचे प्रा. सुमित कुमार झा निर्णायक होते.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे आणि प्रियंवदा टोकेकर, सर्व समन्वयक, ग्रन्थपाल श्री. नारायण बारसे आणि महविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे विभाग आभारी आहे.

सप्ताहातील स्पर्धा विजेत्यांना संस्कृत उत्सवाचे औचित्य साधून प्रमाणपत्रं व पारितोषिकं वितरण करण्यात आली.

**जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन**



जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या इंग्रजी वाङ्मय मंडळाचा उद्‌घाटन सोहळा महाविद्यालयाच्या कात्यायन सभागृहात पार पडला. नवी मुंबईतील प्रसिद्ध पत्रकार आणि माध्यमतज्ज्ञ जी. मोहिउद्दीन जेड्डी याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते इंग्रजी विभागाच्या 'फ्रेग्रंस' या वाङ्मयीन पुस्तिकेचे प्रकाशनदेखील या वेळी करण्यात आले. इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद खराटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नवी मुंबईतील पत्रकार दिनेश पाटील आणि दीपक सोनावणे याप्रसंगी उपस्थित होते. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आपल्यातील कलागुणांचा शोध घ्यावा या उद्देशाने दरवर्षी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्यावतीने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांची सुरुवात साहित्य आणि पत्रकारिता या क्षेत्रातील नामवंत व्यक्तीच्या व्याख्यानाने होते. यावर्षीच्या उद्‌घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. जेड्डी यांनी याप्रसंगी 'पत्रकारिता आणि लेखन' या विषयावर आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांशी सोप्या भाषेत संवाद साधत त्यांनी लक्षात आणून दिले की, पत्रकारासाठी प्रामाणिकपणा

आणि निःपक्षपातीपणा याबरोबरच आपल्या व्यवसायाप्रती निष्ठा असणे अत्यावश्यक आहे. पत्रकाराने सतत वाचत राहावे आणि शिकण्यासाठी तयार असावे यावर त्यांनी भर दिला. आजच्या जगात पत्रकारितेच्या क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध झाल्याचे सांगतानाच त्यांनी 'सत्याप्रती आदर, सुस्पष्टता आणि मानवी संवेदनशीलता' पत्रकारितेचे आधारस्तंभ असल्याचे लक्षात आणून दिले.

मानवाच्या चंद्रावरील पदार्पणाला पन्नास वर्ष पूर्ण होत असताना आणि भारताच्या चांद्रयान मोहिमेच्या पार्श्वभूमीवर या वर्षीचा अंग 'मूनस्ट्रक' (चंद्रवेडा) या विषयाला वाहिलेला आहे. या हस्तलिखितातील कविता, लेख आणि इतर साहित्याचे लेखन, संपादन आणि सजावट महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेली आहे. विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खराटे यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. मराठी विभागाचे प्रा. संतोष राणे यांचे बहुमोल सहकार्य याप्रसंगी लाभले.

**दीक्षांत समारंभ**




विद्या प्रसारक मंडळांच्या स्वायत्त शैक्षणिक अभ्यासक्रमांचा १६ वा दीक्षांत समारंभ गुरुवार, ५ सप्टेंबर २०१९, शिक्षकदिनाच्या दिवशी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळात साजरा केला गेला. प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. जयरामन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मोठ्या प्रमाणात विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग या कार्यक्रमाला ऊपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष राणे यांनी केले. अत्यंत सुनियोजित आणि नेत्रदीपक असा हा कार्यक्रम विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कायम स्मरणात राहील असाच होता.

**वाडा येथील तिलसा गावात दिव्यांगांशी अनोखा संवाद**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ठाण्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालय नवनवीन उपक्रम राबवित असते. जी मुले अभ्यासात मागे असतात त्यांच्यासाठी सराव परीक्षांसोबत प्रात्यक्षिक सहल भेटीद्वारे त्यांच्यात बदल घडवून आणण्यासाठी खास रेमेडियल कमिटीतर्फे वाडा येथे सोबतीला भेट देण्यात आली. सोबती या दिव्यांग मुलांसाठी संजीवनी असलेल्या वाडा येथील केंद्राला ठाण्याच्या जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेजच्या तब्बल ४८ विद्यार्थ्यांनी नुकतीच भेट दिली. या भेटीतून मिळालेल्या आगळ्या वेगळ्या अनुभवामुळे हे विद्यार्थी अंतर्मुखच झाले. ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ यांच्या पत्नी प्रा. उषा बाळ व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकाराने सोबतीचा उदय झाला आहे.

दिव्यांग मुलांचा सांभाळ करण्यासाठी ठाण्यातील प्रा. उषा बाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या सोबती या संस्थेने वाडा येथे केंद्र उभारले आहे. तेथे १२ दिव्यांग मुले असून त्यांना सदोदित आनंदी ठेवावे आणि त्यांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी सोबती संस्था सर्वतोपरी झटत आहे. या मुलांसोबत जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या तब्बल ४८ विद्यार्थ्यांचा चमू नुकताच गेला होता. त्या मुलांसोबत दिवसभर आनंद

लुटला. प्रारंभी दिव्यांग मुलांनी त्याची ओळख योग्य शब्दात करून दिली. जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्या सर्वांनी कायमस्वरूपी आठवण भेट म्हणून उपयुक्त अशा औषधी व फळाफुलांची रोपटी दिली. त्यानंतर मनोरंजनपर छोट्याशा कार्यक्रमात आर्या हिने गाणी सादर केली. सृष्टी व सूरज राठोड यांनी नृत्य सादर केले. दिव्यांग व महाविद्यालयीन मुलांमध्ये अंताक्षरीच्या जुगलबंदीने रंगत आणली.

त्यावेळी प्रा. उषा बाळ यांनी दिव्यांग मुलांसाठी स्थापन केलेल्या सोबतीची पार्श्वभूमी सांगितली. त्यांनी सर्व मुलांना सामाजिक भान जपण्याचा मोलाचा सल्ला दिला. यावेळी दिव्यांग मुलांविषयी बोलताना वाड्यातील निसर्गाच्या सानिध्यात या मुलांमध्ये आमूलाग्र बदल झाल्याचे सांगून त्याचाच परिणाम म्हणून ही मुले आनंदी असल्याचे आढळून येते याकडे लक्ष वेधले. या मुलांमध्ये असलेल्या कलागुणांचा वापर करून ते राख्या, आर्टिफिशल ज्वेलरी, मंगळसूत्र आदी वस्तू बनवितात व त्याची विक्रीही केली जाते. या दिव्यांग मुलांचा दिनक्रम ठरलेला असतो. तेथील शिक्षक मयुरी करंजकर, किशोरी गिजे, मेघा बनसोडे, शंकर भालेराव, शनिदेव सोनी, अमोल वाघ यांचे विशेष कौतुक. यावेळी एकसुरात सर्वांनी मिळून इतनी शक्ती दे हमे दाता... आणि 'वंदे मातरम्' गीत गाऊन परिसर प्रफुल्लित केला. या शिवाय आकर्षक अभिप्राय वहीसुद्धा भेट देण्यात आली. खूप आनंदी व समाधानाने मुलांनी निरोप घेतला. अशा वेगळ्या प्रकारच्या सहलींतूनच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव तयार होत असते. म्हणून असा उपक्रम इतरांनीसुद्धा हाती घ्यावा आणि प्रत्यक्ष भेटीतून त्या मुलांना आनंद देण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा, हीच अपेक्षा. जोशी-बेडेकर कनिष्ठ महाविद्यालय वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. संध्या वैद्य, प्रा. कुसुम यादव, प्रा. शकीला समानी तसेच प्रा. स्वप्निल मयेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम पार पडला. त्यासाठी त्यांना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रा. संगीता दीक्षित, पर्यवेक्षक प्रा. शर्मा यांनी उत्तेजन दिले.

**डॉ. प्रा. रश्मी अग्निहोत्री यांना पीएच. डी. प्रदान**



जोशी- बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. प्रा. रश्मी अग्निहोत्री यांनी 'महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग : उदयोन्मुख संधी आणि आव्हाने' या विषयावर मुंबई विद्यापीठातून पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केली आहे. के.जे. सोमैया कला व वाणिज्य महाविद्यालय, विद्याविहार, मुंबईचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दिलीप पलसरपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१२ मध्ये त्यांनी संशोधनास सुरुवात केली.

महाराष्ट्रात विशेषतः प्राचीन लेणी, मंदिरे, स्वच्छ समुद्रकिनारे, प्राचीन किल्ले आणि स्मारके, वन आणि वन्यजीव, अनोखी थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे आणि अशी अनेक पर्यटन आकर्षणे आहेत. तसेच, येथील उत्सव, कला आणि संस्कृतीची समृद्ध परंपराही पर्यटनाला आकर्षित करणाऱ्या आहेत. महाराष्ट्र राज्य हे देशातील अशा मोजक्या प्रतिभावान राज्यांपैकी एक आहे जिथे मौल्यवान विदेशी चलन निर्मितीच्या संधी बरोबरच मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीच्या संधीही उपलब्ध आहेत. राज्याची चवदार पाकसंस्कृती देखील पर्यटकांसाठी एक आकर्षण ठरू शकते. तथापि, महाराष्ट्रात पर्यटन उद्योगासाठी काही विशिष्ट अंतर्भूत आव्हाने आहेत. जसे, कार्यक्षम दळणवळणाचा आणि आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरी प्रशिक्षित मनुष्यबळ संसाधने, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

आणि कुचकामी धोरणे इ. अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील पर्यटनासाठी येणारी सर्व आव्हाने व उदयोन्मुख संधींचा अभ्यास केला आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१० जुलै २०१९ :** मुंबई विद्यापीठाच्या कनवोकेशन हॉलमध्ये सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व इलेक्शन ऑफीसर ह्यांची विद्यार्थी परिषदे संदर्भात बैठक पार पडली. सदर बैठकीत काही मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली व विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यात पार पडतील ह्या बाबत माहिती देण्यात आली.

**१६ जुलै २०१९ :** प्रभारी प्राचार्यांनी विभागीय सहसंचालक पनवेल ह्यांच्या कार्यालयास भेट देवून सहसंचालक श्री. राजेंद्र धामनस्कर ह्यांची भेट घेतली. सदर भेट ९ सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्तपदांसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळवण्याबाबत होत असलेल्या उशिरा बाबत विचारले असता न्यायालयात चालू असलेल्या मराठा आरक्षण मुद्द्यामुळे उशीर झाल्याचे सांगण्यात आले. ना हरकत प्रमाणपत्र लवकरात लवकर देतो असे त्यांनी सांगितले.

**१८ जुलै २०१९ :** प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार व ग्रंथपाल श्रीमती शितल औताडे ह्यांनी एफडीए द्वारे ठाणे कमिशनवर ऑफिस येथे आयोजित करण्यात आलेले 'इट राईट इंडिया' ह्या कार्यशाळेत सहभाग घेतला. सदर कार्यशाळेत विद्यार्थ्यांना योग्य आहार निवडीस मदत करणे व कॅन्टीनमध्ये सकस आहार उपलब्ध करून देणे, तसेच प्रत्येक महाविद्यालयात कॅन्टीन मॅनेजमेंट कमिटी असणे ह्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

**१९ जुलै २०१९ :** आमचे महाविद्यालय मुंबई विद्यापीठाच्या एलएलएम प्रवेश प्रक्रिया परीक्षेचे केंद्र होते. ५०० विद्यार्थ्यांनी आमच्या केंद्रावर परीक्षा दिली. सदर परीक्षा दुपारी २ ते ३ ह्या वेळेत घेण्यात आली.

**२० जुलै २०१९ : विधी निकाल (LLB) :** विद्यापीठाद्वारे मिळालेल्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाने द्वितीय सत्र व चतुर्थ सत्राचे निकाल जाहीर केले. तसेच विद्यापीठाद्वारे सत्र सहाचा देखील निकाल सायंकाळी जाहीर करण्यात आला.

महाविद्यालयाचा निकाल

प्रथम वर्ष विधी : २९%
द्वितीय वर्ष विधी : ४२%
तृतीय वर्ष विधी : ७९%

**२५ जुलै २०१९ : प्रवेश प्रक्रिया :** द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विधीची प्रवेश प्रक्रीया सुरू करण्यात आली. SBI चे Payment gateway वापरून विद्यार्थ्यांनी प्रवेश फी भरण्यास सुरुवात केली.

प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| II LLB | १६६ | – २१ | – तात्पुरते प्रवेश |
| III LLB | १३२ | – १५ | – तात्पुरते प्रवेश |

**२७ जुलै २०१९ : विद्यार्थी परिषद :** विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकी संदर्भात तृतीय वर्ष विधीचे विद्यार्थी श्रीमती रिटा व श्री. ॲलेक्स ह्यांनी विद्यार्थ्यांसाठी सादरीकरण केले. त्यात परीषदेत असलेली विविध पदे व त्यांची पात्रता निकष ह्या संदर्भात माहिती देण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार व निवडणूक अधिकारी श्री. विनोद वाघ ह्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले व सर्व विद्यार्थ्यांना मतदान करण्यास व कुठल्याही प्रकारे अमाननीय मतदान होऊ नये असे आवाहन

करण्यात आले. सर्वांनी मतदानात सहभागी व्हावे असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

**२९ जुलै २०१९ : मराठी मंडळ** : मराठी मंडळाची स्थापना करण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना एकत्र जमवण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी उत्साहाने ह्यात सहभाग दर्शवत कायद्याविषयी लिहिण्यात व भाषांतर करण्यास मदत करण्यासंबंधात तयारी दर्शवली.

**३० जुलै २०१९ : आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा** : प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांनी सर्व विद्यार्थ्यांची मीटिंग बोलावून त्यांना अंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासंदर्भात माहिती दिली. विद्यार्थ्यांना सदर स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन त्याचे फायदे मिळवण्याबाबत उत्तेजित करण्यात आले.

**१० ऑगस्ट २०१९** : रोजी होणाऱ्या माजी विद्याार्थ्यांच्या रि-युनियन संदर्भात आमंत्रण पत्रिका पाठवण्यात आल्या. तसेच महाविद्यालयातील ग्रंथालयात वकिलांना सदस्यत्व देण्यास सुरुवात करण्यात आली.

**विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिवस**

१ ऑगस्ट, २०१९ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापन दिनी खालील विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **मि. मधुसूदन शेट्टी** (तिसरे वर्ष) २०१८-१९ | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई - राष्ट्रीय मूट कोर्ट | विजयी |
| | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई - सी. जे. आय. पत्र-लेखन स्पर्धा | विजयी |
| | के. एल. ई. सोसायटी विधी महाविद्यालय - राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा | उपविजेता |
| | व्हि. पी. एम. टी.. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे - डॉ. वा. ना. बेडेकर स्मरणार्थ कायदेशीर वादविवाद स्पर्धा | प्रथम उत्कृष्ट वक्ता |
| **मि. एन. बापाजी** (तिसरे वर्ष) २०१८-१९ | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई - जजमेंट लेखन स्पर्धा | विजयी |
| | के. एल. ई. सोसायटी विधी महाविद्यालय - राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा | उपविजेता |
| **मिस. रिटा उतेकर** (दुसरे वर्ष) २०१८-१९ | के. सी. विधी महाविद्यालय चर्चगेट, मुंबई - जजमेंट लेखन स्पर्धा | विजयी |

विश्वास हा खोडरबरसारखा असतो. तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीबरोबर तो कमी होत जातो!

| | | |
|---|---|---|
| **मिस. नीती पिल्लई**<br>(दुसरे वर्ष) २०१८-१९ | के. सी. विधी महाविद्यालय चर्चगेट, मुंबई<br>- सी. जे. आय. पत्र लेखन स्पर्धा<br>नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर<br>- राज्य स्तरिय मूट कोर्ट | विजयी<br><br>उपविजेता |
| **मिस. स्टेफी अलवा**<br>(दुसरे वर्ष) २०१८-१९ | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई<br>- जजमेंट लेखन स्पर्धा<br>नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर<br>- राज्य स्तरिय मूट कोर्ट | विजयी<br><br>उपविजेता |
| **मि. प्रतीक टुंगारे** | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई<br>- राष्ट्रीय मूट कोर्ट<br>व्हि. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे | विजयी<br><br>प्रथम उत्कृष्ट वक्ता |
| **मिस. श्रीलक्ष्मी वेलियात**<br>(दुसरे वर्ष) २०१८-१९ | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई<br>- राष्ट्रीय मूट कोर्ट | संशोधक विजयी |
| **मि. अभिषेक हेगडे**<br>(दुसरे वर्ष) २०१८-१९ | जी. जे. अडवाणी विधी महाविद्यालय, बांद्रा, मुंबई<br>- सी. जे. आय. पत्र लेखन स्पर्धा | विजयी |
| **मिस. निकिता पाटोडे**<br>(दुसरे वर्ष) २०१८-१९ | जे. सी. विधी महाविद्यालय, विलेपार्ले, मुंबई<br>- कायदेशीर मसुदा लेखन स्पर्धा | विजयी |

द्वितीय व तृतीय वर्ष विधी वर्गांची शिकवणी सुरू करण्यात आली. मिस. हेतल मिशेरी व मिस. रुपाली येर्णानसेस ह्यांना पूर्ण वेळ प्राध्यापक म्हणून विद्या प्रसारक मंडळाच्या मार्फत नियुक्त करण्यात आले. श्री. यतीन पंडित, डॉ. संगीता मेहता, डॉ. महेश बर्वे, श्री. अरुण गायकवाड, श्रीमती मनिषा वाघ व श्री. एस. एम. पायक ह्यांना विझिटिंग फॅकल्टी म्हणून नियुक्त करण्यात आले.

**पावसामुळे महाविद्यालय बंद**

दिनांक ३ व ५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयांना पावसामुळे सुट्टी देण्यात आली. शनिवार ३ ऑगस्ट २०१९ रोजी ठाण्याच्या आयुक्तांनी सुट्टी जाहीर केली व दिनांक ५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र शासनातर्फे काही जिल्ह्यांना सुट्टी जाहीर करण्यात आली. त्यात ठाण्याचा देखील समावेश होता.

**माजी विद्यार्थी मेळावा**

माजी विद्यार्थ्यांचे री युनियन दिनांक १० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले होते. विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेसाठी असलेली प्रस्तावित घटना जनरल हाऊस द्वारे सुमारे २६० माजी विद्यार्थ्यांसमोर स्वीकारण्यात आली.

---

सगळ्यात सुंदर नाते हे दोन डोळ्यांचे असते. ते एकाच वेळी उघडझाप करतात, एकाचवेळी रडतात, एकाचवेळी झोपतात; ते ही आयुष्यभर एकमेकांना न बघता!

**'विधी बंध' माजी विद्यार्थी संघटना**

अध्यक्ष व्हि. पी. एम. ठाणे डॉ. श्री. विजय बेडेकर, माननीय सहसचिव व श्री. जे. एन. कयाल व प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या उपस्थितीत दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी कार्यकारी समितीची निवड करण्यात आली.

१. अध्यक्ष – सुनील परांजपे

२. उपाध्यक्ष – ॲड. सुनिता कापरेकर

३. सचिव – ॲड. संजय म्हात्रे

४. सहसचिव – ॲड. अनिता भकतवानी

५. खजिनदार – ॲड. राजेंद्र नलगे

६. सभासद – ॲड. भावना पिसाळ, रवदीप गांधी, योगेंद्र पेंडसे, कृष्णा पाटील, बलदेव राजपूत, नवनीत गोसावी, रोहन पालकर, रघुजीत चहल, यतीन पंडित, राजेंद्र रावराणे

७. डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रभारी प्राचार्या (सन्मानप्रद सभासद)

कार्यकारी समितीची प्रथम बैठक निवडणुकीनंतर त्याच दिवशी घेण्यात आली. सदस्यत्वासाठी ५००/- फी ठरविण्यात आली असून बँकेत खाते उघडून ते खाते खजिनदार, अध्यक्ष व सचिव ह्यांनी हाताळण्याचे ठरविण्यात आले. समितीची दुसरी बैठक दि. १४ सप्टेंबर, २०१९ रोजी महाविद्यालय परिसरात घेण्याचे ठरविण्यात आले.

**जनहित याचिका कार्यशाळा (PIL)**

दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ रोजी ''जनहीत याचिका दाखल करणे त्याचा मसुदा तयार करणे'' ह्या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. जे. सी. विधी महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापक



डॉ. शर्मिला घुगे ज्यांना जनहीत याचिका दाखल करण्याबाबत अनुभव आहे. त्यांना स्त्रोत व्यक्ती बोलवण्यात आले होते. सदर कार्यशाळा सायंकाळी ६ ते ७.३० ह्या वेळेत भरवण्यात आली होती.

**विशेष शिकवणी वर्ग**

वकिली क्षेत्रात ४० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेले वरिष्ठ वकील श्री. अरुण जालीसादगी ह्यांनी विद्यार्थ्यांना ''कायदेशीर मतांच्या बाबतीत मसुदा'' कसा तयार करावा ह्या बाबतीत दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजी सायंकाळी ६ ते ७.३० ह्या वेळेत व्याख्यान दिले. अशा प्रकारचे हे पहिलेच व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मसुदा तयार करताना आवश्यक असलेल्या बाबी समजवण्यात आल्या.

**ग्राहक संरक्षण कायदा २०१९**

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी विद्यापीठातील शैक्षणिक अधिकाऱ्यांना पत्र लिहून अभ्यासक्रमात असलेला ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ बदलून ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अभ्यासक्रमात समाविष्ट करावा ह्याबाबतीत कळविले. सदर कायदा संसदेत मंजूर झाला असून दि. ९ ऑगस्ट २०१९ रोजी राष्ट्रपतीची परवानगी देखील प्राप्त झाली आहे.

---

नात्याची सुंदरता एकमेकांचे दोष स्वीकारण्यात आहे. कारण एकही दोष नसलेल्या माणसाचा शोध घेत बसलात, तर आयुष्यभर एकटे राहाल!

### विधी (३ वर्षे) अभ्यासक्रम अतिरिक्त तुकडी

महाविद्यालयात प्रवेश घेण्याकरिता इच्छुक विद्यार्थ्यांची वाढती मागणी बघता आमच्या महाविद्यालयाने दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त तुकडी करिता मुंबई विद्यापीठात अर्ज दाखल केला. सध्या महाविद्यालयात चार तुकड्या असून प्रथम वर्ष विधीची प्रवेश क्षमता २४० इतकी आहे. अर्ज दाखल करण्याकरिता महाविद्यालयाने २५,०००/- रुपये फी भरलेली आहे.

### फोटोकॉपी व पुनर्तपासणी

दुसऱ्या व चौथ्या सत्रातील ज्या विद्यार्थ्यांना फोटोकॉपीसाठी अर्ज दाखल केला. अशा विद्यार्थ्यांना दिनांक १७ ऑगस्टपासून फोटोकॉपी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. पुनर्तपासणीचे निकाल जस जसे तपासणी पूर्ण होत गेली त्याप्रमाणे विषयवार निकाल लावण्यात आले. दिनांक २४ सप्टेंबर २०१९ रोजी पर्यावरण संरक्षण कायदा ह्या शेवटच्या विषयाचा निकाल जाहीर करण्यात आला.

### वाईल्ड लाईफ मूट

आमच्या विद्यार्थ्यांची दिनांक ३१ ऑगस्ट रोजी GLC मुंबई येथे वाईल्ड लाइफ मुटकोर्ट स्पर्धेसाठी नोंदणी करण्यात आली.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### ऑगस्ट २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता

२ ऑगस्ट : ब्रीम्सच्या प्राध्यापिका डॉ. स्मिता जपे यांचे फायनान्शियल मॅनेजमेंट प्रॅक्टिस इन इंडिया इंक हे पुस्तक हिमालय पब्लिकेशन तर्फे प्रकाशित झाले.

८ - ९ ऑगस्ट : राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या म्हणजेच NAAC च्या परीक्षण समितीच्या सदस्यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्सला भेट दिली व ब्रीम्सचे संचालक, IQAC सदस्य, विविध समिती सदस्य, विभाग प्रमुख यांच्याशी परस्पर संवाद साधून परीक्षण केले. तसेच परीक्षण समितीच्या सदस्यांसाठी ब्रीम्सच्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी मिळून एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले.





१५ ऑगस्ट : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे संचालक आणि कर्मचारी वर्ग स्वतंत्र दिनाच्या ध्वजवंदन समारंभाला उपस्थित राहिले.



१७ ऑगस्ट : संचालक डॉ. नीतिन जोशी सी. आय. आय. कस्टमर ऑब्सिएशन अवॉर्ड रिफ्रेशर प्रोग्राममध्ये सहभागी झाले.

१८ ऑगस्ट: डॉ. नीतिन जोशी उद्योग अनुभव प्रतिष्ठानच्या बैठकीला उपस्थित राहिले.

१९ ऑगस्ट: प्रा. कृणाल पुंजानी यांनी ब्रीम्सच्या सी. एस. आर. पथकातर्फे MUSE फाऊंडेशनच्या सहाय्याने महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी देणगी मोहीम राबविली.



१८ – २५ ऑगस्ट: डॉ. नीतिन जोशी यांनी नूरजी अवॉर्ड फॉर बिझिनेस एक्सलन्ससाठी गोदरेज स्टोरेज सोल्यूशनचे मूल्यांकन / परीक्षण केले.




१९ – २१ ऑगस्ट: डॉ. स्मिता जपे यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील आरोग्य सेवा शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी फिनान्शिअल मॅनेजमेंट फॉर हेल्थकेअर ऑर्गनायझेशन या विषयावरील सत्रांचे आयोजन केले.

२२ ऑगस्ट: भारताचे मानव संसाधन विकास मंत्री माननीय डॉ. रमेश पोखरियाल यांच्या इनोव्हेशन फॉर रीसर्जेन्ट इंडिया या विषयावरील 'इंडिया फर्स्ट लीडरशीप टॉक सीरिजचे' वेबकास्टिंग करण्यात आले.

२३ ऑगस्ट: डॉ. पल्लवी, डॉ. मीनाक्षी आणि प्रा. विभूती यांनी आय.क्यू.ए.सी. स्थापना दिन समारोहाचे आयोजन केले.

२९ ऑगस्ट : पी. जी. डी.एम. च्या विद्यार्थ्यांना मॅनेजमेंट फिल्म फेस्टिवल अंतर्गत Pursuit of happyness हा चित्रपट दाखविण्यात आला. व त्यानंतर प्रा. दीप्ती पेरीवाल आणि प्रा. कांचन अक्षय यांनी चित्रपटामध्ये दाखवण्यात आलेली नायकाची जिद्द, चिकाटी, प्रसंगाला सामोरे जाण्याचे धैर्य, इत्यादी आणि चित्रपटातून मिळालेली शिकवण याबद्दल विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

३१ ऑगस्ट: पी. जी. डी.एम. च्या विद्यार्थ्यांनी ठाकूर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे झालेल्या फायनान्स कॉन्क्लेव्हमध्ये भाग घेतला. प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



डॉ. नीतिन जोशी यांनी इंदूरच्या ओरिएंटल विद्यापीठामध्ये पीएचडी साठीच्या शोध प्रबंधांचे मूल्यांकन केले.

डॉ. मिनाक्षी मल्होत्रा यांची दोन प्रकल्पांच्या पीएचडीच्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन सल्लागार म्हणून नियुक्ती झाली.

•••

जी व्यक्ती तुमच्या प्रगतीवर जळते त्याचा तिरस्कार कधीच करू नका. कारण ती व्यक्ती स्वतःपेक्षा तुम्हाला उत्कृष्ट व्यक्ती समजून जळत असते.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

तर 'अग्नि'चे भाषांतर 'फायर' होते. अग्नि म्हणजे 'फायर' व वह्नी म्हणजेही 'फायर' इंग्रजीत एकच शब्द आहे फायर. परंतु वेदाचा जो पहिला मंत्र आहे (अग्निमिळे पुरोहतम्) येथे 'अग्नि'च्या जागी 'वह्नी' चालायचा नाही. 'वह्नी पुरोहितम्' चालणार नाही. जितके भाष्य आहे तितका वेद नाही. संहिता म्हणजे अक्षर वेद आहे.'

विनोबांनी पुढे असं म्हटलं की, भाष्य हे प्रत्येकाचे वेगळे असू शकते. लोकमान्य टिळकांनी केलेल्या ऋग्वेदातील ऋचेचा दाखला देऊन विनोबा पुढीलप्रमाणे समजावून सांगतात –

''मा नो दीर्घा अभि नशन्तमिस्रा – ह्या दीर्घ तमिस्रा आम्हाला त्रास न देवोत. तमिस्रा म्हणजे रात्र. त्याचा लोकमान्यांनी अर्थ काढला की वैदिक ऋषी उत्तर ध्रुवावर राहत होते. तेथे सहा महिन्यांची रात्र असते. म्हणून ऋषी देवाची प्रार्थना करीत होते की, या दीर्घ रात्रींपासून आम्हाला सोडव – हा आधिभौतिक अर्थ झाला. आध्यात्मिक अर्थ केला असता तर तो असा झाला असता – या अविद्यारूप दीर्घ रात्रीपासून –ज्यामध्ये आम्ही शेकडो जन्म घेऊन वाहत आहोत – आम्हाला सोडव. याप्रकारे अनेक प्रकारचे संशोधन; ऐतिहासिक, आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक भाष्य होऊ शकते.''

विनोबा भावे १९१८ मध्ये वाईला वास्तव्यास होते. त्याकाळात त्यांचा अखंड व्यासंग चाले. राम शेवाळकर लिखित 'विनोबा सारस्वत' या साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या ग्रंथाच्या प्रास्ताविकात विनोबा भावे यांच्या वाई मुक्कामीचा दिनक्रम व एक वर्षात त्यांनी काय काम केले याचा लेखाजोखा आहे. ते लिहितात –

वाई येथील वास्तव्याचा विनियोग त्यांनी (विनोबांनी) कसा केला याचा वृत्तांत दि. १० फेब्रुवारी १९१८ रोजी वाईहून गांधीजींना पाठविलेल्या पत्रात दिला आहे.

१. उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे, शांकरभाष्य, मनुस्मृती आदी पातंजल योगदर्शन या ग्रंथांचा अभ्यास केला. शिवाय न्यायसूत्र, वैशेषिक सूत्र, याज्ञवल्क्य स्मृती हे ग्रंथ वाचले.

२. गीतेचा वर्ग चालविला. सहा विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेता अर्थासह गीता शिकविली.

३. ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय चार विद्यार्थ्यांना शिकविले.

४. नऊ उपनिषदे दोन विद्यार्थ्यांना शिकवली.

५. विद्यार्थ्यांसाठी हिंदी वर्तमानपत्र वाचण्याचा उपक्रम केला.

६. दोन विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकवली.

७. रायगड, सिंहगड, तोरणा वगैरे ऐतिहासिक स्थळांची चारशे मैलांची पायी सफर केली.

८. प्रवासात गीतेवर पन्नास प्रवचने दिली.

९. वाईत विद्यार्थी मंडळाची स्थापना केली. पैशाला दोन शेर या भावान पंधरा विद्यार्थी दळीत असत. त्या पैशांतून दोन महिन्यात चारशे पुस्तकांचे एक वाचनालय स्थापन केले.

१०. सत्याग्रहाश्रमाच्या नावाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला.

वरील वृत्तांतावरून वर्षभरातील विनोबांच्या व्यासंगाचा आवाका व वेग लक्षात यायला हरकत नाही.

'गीताई' व 'गीता प्रवचने' ही पुस्तके महाराष्ट्रातल्या घराघरात पोहोचली आहेत. या व्यतिरिक्त 'गीताई-चिंतनिका', 'विचारपोथी', 'उपनिषदांचा अभ्यास', 'स्थितप्रज्ञ दर्शन', 'स्वराज्यशास्त्र', 'भूदानगंगा' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. याखेरीज प्रमुख धर्मग्रंथांतील उपदेशांचा अर्क त्यांनी 'ईशावास्य', 'ऋग्वेदसार', 'गुरुबोधसार', 'कुराणसार', 'ख्रिस्तधर्मसार', 'जपुजी', 'अष्टादशी', 'धम्मपद' या सार ग्रंथांच्या रूपाने मराठीत उपलब्ध करून दिला आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम या संतांच्या वचनाचे नवनीत निवडून तेही पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले आहे. विनोबांनी 'महाराष्ट्र धर्म' व 'सेवक' या नियतकालिकांतून वेळोवेळी लिहिलेल्या लेखांची संकलने मधुकर, जीवनदृष्टी, दीक्षा, सिंहावलोकन, तिसरी शक्ती, आत्मज्ञान व विज्ञान इत्यादी नावांनी पुस्तकरूपात आली आहे.

विनोबांचे शिक्षणाबद्दलचे विचार मोठे उद्‌बोधक आहेत. राम शेवाळकरांच्या भाषेत सांगायचे तर -

'शिक्षण ही उभयान्वयी प्रक्रिया आहे असे विनोबा म्हणतात. भारतीय भाषांमध्ये To Teach या अर्थाला शब्द नाही. याचा अर्थ शिकविणे ही सुद्धा शिकण्याचीच प्रक्रिया आहे. 'तेजस्विनावधीतमस्तु' या मंत्रात द्विवचन आहे. अध्ययन-अध्यापनाच्या विषयातही गुरू व शिष्य दोघांचा सहभाव गृहीत धरला आहे. शिष्याच्या सहवासात व सहकार्याने जीवनाच्या क्षेत्रात जीवनशुद्धीचे प्रयोग करीत येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे व त्याद्वारे अनुभवाच्या रुपातील ज्ञान मिळविणे हे गुरू व शिष्य ह्यांचे धर्मकर्तव्य आहे. यासाठी जीवन व शिक्षण यांची सध्यासारखी अनैसर्गिक फाळणी नको. जीवनाचे शिक्षण जीवनाच्या क्षेत्रातच दिले गेले पाहिजे. भगवंताने अर्जुनाला कुरुक्षेत्रात गीता सांगितली, म्हणून ती पचली. गीतेचे आगाऊ क्लासेस काढले नाहीत.'

शिक्षणाचा प्रवास विनोबांच्या मते 'पूर्णात् पूर्णम्' असा आहे. अपूर्णतेकडून पूर्णत्वाकडे ही संकल्पना मनुष्यत्वाचा अपमान करणारी आहे. खरी मनुष्य जीवनाची यात्रा पूर्णत्वाकडून पूर्णत्वाकडे चालली आहे. फक्त फरक एवढाच की, विद्यार्थ्याचे पूर्णत्व पहिल्यांदा झाकलेले असते. विद्यार्थ्याला त्याच्या पूर्णत्वाची जाणीव करून देण्याचे काम शिक्षण व शिक्षकाचे असे विनोबा मानतात. स्वतःच्या पूर्णतेची स्वतःला ओळख होणे हेच ज्ञान. भारतीय शिक्षण पद्धतीत हेच ज्ञान अभिप्रेत आहे.

राजशेखर हा प्रख्यात संस्कृत मीमांसक म्हणाला होता-

**'वाङ्‌मयम् द्विविधम् शास्त्रं काव्यं च।'**

अर्थात वाङ्‌मय हे दोन प्रकारचे असते शास्त्र व काव्य, वैचारिक व ललित, बोधप्रधान मोदप्रधान, शिकवणारे व रिझवणारे, बौद्धिक आनंद देणारे ज्ञानसंपन्न लेखन विनोबांनी केले खरे, पण ते मानसिक आनंद देणाऱ्या लालित्याच्या जोडीने.

विनोबा भावे यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या लेखनाचे, जीवनदृष्टीचे चिकित्सक आकलन होणे सद्यस्थितीत अगत्याचे झाले आहे. जगाकडे अत्यंत व्यापकत्वाने पाहणाऱ्या विनोबांनी 'जय जगत्' चा दिलेला नारा सध्याच्या काळात कधी नव्हे इतका समयोचित वाटल्याशिवाय राहत नाही. नैसर्गिक संसाधनांना अनिर्बंध ओरबाडण्याच्या, सत्तासंघर्षाच्या, वैश्विक अशांततेच्या या काळात विनोबांचे विचार निश्चितच दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतील यात तीळमात्रही शंका नाही.

**- डॉ. प्रशांत पु. धर्माधिकारी**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.